मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस

मुंबई/ पालघर | मुंबई, गुरुवार, १९ सप्टेंबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - ८९ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

Email : vrittamanas1@gmail. com

*मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २७ वर्षे करणारे 'दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.*

***दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स***

*भ्रमणध्वनी - ८६५५१९४४५२, ८५९१६६२६१६,९८६७३०८०६३*



भरधाव स्कूलबसची जोरदार धडक, तिघेजण जागीच ठार

पान ४

# 'वन नेशन वन इलेक्शन'ला केंद्राची मंजुरी

## विधानसभा-लोकसभेची निवडणूक सोबत | विधेयक हिवाळी अधिवेशनात संसदेत मांडणार

**प्रतिनिधी**
**नवी दिल्ली**

केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी देशात लोकसभेसोबत विधानसभा निवडणुका (वन नेशन वन इलेक्शन) घेण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली. हे विधेयक हिवाळी अधिवेशनात म्हणजेच नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये संसदेत मांडले जाईल. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, 'पहिल्या टप्प्यात विधानसभा आणि लोकसभा निवडणुका एकाच वेळी होणार आहेत. त्यानंतर 100 दिवसांत दुसऱ्या टप्प्यात नागरी निवडणुका घ्याव्यात.

एक देश एक निवडणूक या संदर्भात माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी सादर केलेला अहवाल केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजूर केला आहे. वन नेशन, वन इलेक्शन याला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्यानंतर आता याबाबत संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. काँग्रेससह विरोधी पक्षांनी याला विरोध केला



असून, भाजपासह एनडीएने याचे स्वागत केले आहे. २०२९ रोजी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीवेळीच वन नेशन, वन इलेक्शन लागू केले जाणार आहे. त्रिशंकू विधानसभेत (कोणाकडेही बहुमत नाही) आणि अविश्वास प्रस्ताव आल्यास, उरलेल्या 5 वर्षांच्या कालावधीसाठी नव्याने निवडणुका घेतल्या जाऊ शकतात, अशी शिफारस कोविंद समितीने केली आहे.

'एक देश-एक निवडणूक'ला कायदेशीर स्वरूप देण्याची तयारी केंद्र सरकारने तीव्र केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत 'वन नेशन-वन इलेक्शन' या समितीच्या अहवालाला मंजुरी देण्यात आली आहे. या संदर्भात माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या नेतृत्वाखाली समिती स्थापन करण्यात आली होती. गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये ही समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने मार्चमध्ये राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना अहवाल सादर केला होता. यात लोकसभा तसेच राज्याच्या विधानसभा आणि पंचायत निवडणुका कशा घेता येतील याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच यासंदर्भातील विधेयक संसदेच्या हिवाळी अधिवेशनात आणले जाऊ शकते, असे सांगितले जात आहे.

१५ ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व राजकीय पक्षांना एक देश, एक निवडणुकीसाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले होते. आता मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाल्यानंतर हे विधेयक संसदेत मांडले जाईल. या विधेयकाचे कायद्यात रुपांतर झाल्यास २०२९ मध्ये देशभरातील सर्व राज्यांमध्ये लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका एकत्रितपणे होतील. या निवडणुकांनंतर १०० दिवसांत पंचायत आणि नगरपालिकांच्या निवडणुकाही घेण्यात येणार आहेत.

***अशी होणार 'वन नेशन-वन इलेक्शन'ची अंमलबजावणी***

*माजी राष्ट्रपती राम नाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील समितीने साडे अठरा हजार पानांच्या या अहवालात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका तसेच नगरपालिका आणि पंचायत निवडणुका घेण्यासंदर्भात शिफारसी देण्यात आल्या. या समितीने दोन टप्प्यात एकाच वेळी निवडणुका घेण्याचे सुचवले. पहिल्या टप्प्यात लोकसभेसोबतच सर्व राज्यांच्या विधानसभा निवडणुका घ्याव्यात. दुसऱ्या टप्प्यात नगरपालिका आणि पंचायत निवडणुका घ्याव्यात. लोकसभा-विधानसभा निवडणुका संपल्यानंतर १०० दिवसांच्या आत नगरपालिका आणि पंचायतींच्या निवडणुका घ्याव्यात. यासाठी संविधानातील अनुच्छेद 82A जोडण्याची सूचना समितीने केली होती. अनुच्छेद 82A जोडल्यास लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी होऊ शकतात. अनुच्छेद 82A जोडले गेले आणि त्याची अंमलबजावणी झाली तर लोकसभेच्या कार्यकाळासह सर्व राज्यांच्या विधानसभांचा कार्यकाळ संपेल. म्हणजेच २०२९ पूर्वीच हे अनुच्छेद लागू झाल्यास सर्व विधानसभांचा कार्यकाळ २०२९ पर्यंत असेल, असे सांगितले जात आहे.*

## निरोप घेतो देवा आम्हा आज्ञा असावी, चुकले अमुचे काही त्याची क्षमा असावी !



मुंबई : दहा दिवस भक्तांच्या आनंदाला उधाण आणणारा बाप्पा स्वगृही जायला निघाला अन भाविकांचे डोळे पाणावले. निरोप घेतो देवा आम्हा आज्ञा असावी,चुकले आमुचे काही त्याची क्षमा असावी असे साकडे घालत लाडक्या गणरायाला निरोप दिला.वासुदेवरुपात अवतरलेल्या 'काळाचौकीचा मयुरेश्वर' या मनमोहक बाप्पाला विसर्जनासाठी निरोप देताना सर्वच भक्त पार गहिवरले होते.'बाप्पा ,पुढच्या वर्षी लवकर येरे' असे म्हणत या भक्तांनी अखेर आपल्या मनाची समजूत घालून घेतली आणि गणरायाला निरोप दिला. छायाचित्र - अनिल पानस्कर

## झिम्बाब्वेत 200 हत्ती मारून मांस वाटणार

**हरारे :** झिम्बाब्वेमध्ये उपासमारीचा सामना करण्यासाठी सरकारने हत्तींना मारण्याचे आदेश दिले आहेत. रॉयटर्स या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, झिम्बाब्वेच्या 4 जिल्ह्यांमध्ये 200 हत्ती मारले जातील आणि त्यांचे मांस विविध समुदायांमध्ये वाटले जाईल. झिम्बाब्वे पार्क्स आणि वन्यजीव प्राधिकरणाने याची पुष्टी केली आहे. खरं तर, झिम्बाब्वे गेल्या 4 दशकांतील सर्वात मोठ्या दुष्काळाच्या समस्येला तोंड देत आहे. यामुळे देशातील जवळपास निम्मी लोकसंख्या अन्न संकटाचा सामना करत आहे. एल निनोमुळे पडलेल्या दुष्काळामुळे देशातील संपूर्ण पीक उद्ध्वस्त झाले आहे.

### अजित पवारांच्या राष्ट्रवादीचं अखेर ठरलं | विद्यमान आमदारांचे तिकीट कापले जाणार नाही

# 70 हून अधिक जागांवर दावा

**प्रतिनिधी**
**मुंबई**

विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादीकडून महायुतीमध्ये 70 पेक्षा जास्त जागांवर दावा केला जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच विद्यमान आमदारांपैकी कोणाचेही तिकीट कापले जाणार नसल्याची हमीही अजित पवारांनी दिली असल्याची माहिती आहे. आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या आमदारांची एक बैठक पार पडली. त्यामध्ये जागावाटपावर चर्चा करण्यात आल्याची माहिती आहे.



विद्यमान आमदारांपैकी कोणाचेही तिकीट कापले जाणार नाही अशी बैठकीत हमी देण्यात आली. 2019 साली राष्ट्रवादीचे 54 आमदार निवडून आले होते. त्यात आणखी 15 जागांची मागणी अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून केली जाणार आहे.

या आधी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडून राज्यातील 80 जागांवर दावा करण्याची तयारी होती. मात्र आमदारांसोबत झालेल्या बैठकीत फक्त 15 जागा वाढवून मागण्यांची रननीती आखण्यात आली आहे. त्यामुळे आता 70 पेक्षा जास्त जागांवर दावा करण्यात येणार आहे.



## री-इन्व्हेस्ट 2024 परिषदेचे यशस्वी आयोजन

**मुंबई :** भारत सरकारच्या नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने गुजरातेत गांधीनगरमधील महात्मा मंदिरमध्ये १६ ते १८ सप्टेंबर २०२४ दरम्यान चौथ्या 'ग्लोबल रिन्युएबल एनर्जी इन्व्हेस्टर्स मीट आणि एक्स्पो (री-इन्व्हेस्ट २०२४)' चे आयोजन केले होते. १६ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता आयोजित करण्यात आलेली, 'गुजरातमध्ये हरित रोजगाराद्वारे हरित हायड्रोजन उत्पादनाला गती देणे' या विषयावरील सीईओ परिषद हे या प्रतिष्ठित शिखर परिषदेचे वैशिष्ट्य ठरले. भारताच्या राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशनमध्ये योगदान देण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून गुजरात सरकारने या महत्त्वपूर्ण सत्राचे आयोजन केले होते. हरित हायड्रोजन क्रांतीमध्ये आघाडीवर राहून, अक्षय ऊर्जा क्षेत्रात गुजरात फार पूर्वीपासून आघाडीवर आहे. राज्यात हायड्रोजनची महत्त्वपूर्ण मागणी तसेच पुरवठा बाजूने संसाधन क्षमता देखील भरपूर आहे. मुबलक आरई क्षमता, समर्पित ट्रान्समिशन कॉरिडॉर आणि हरित हायड्रोजन इकोसिस्टम स्थापित करण्यासाठी प्रचंड जमीन उपलब्ध आहे.



## थोडक्यात

### पोर्ट ट्रस्ट कामगार दिवाळी विशेषांकास साहित्य पाठवा

**मुंबई:** अखिल भारतीय बंदर व गोदी उद्योगात जुनी असलेली मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियनला १०४ वर्ष झाली असून, या युनियनचे " पोर्ट ट्रस्ट कामगार " हे मुखपत्र आहे. कामगारांना लिहिण्यासाठी व्यासपीठ मिळावे म्हणून, स्वातंत्र्यसेनानी, माजी खासदार, मुंबईचे माजी महापौर व ज्येष्ठ कामगार नेते डॉ. शांती पटेल यांच्या संकल्पनेतून व ॲड. एस. के. शेट्ये यांच्या संपादकत्वाखाली गेली २७ वर्ष " पोर्ट ट्रस्ट कामगार " हा दिवाळी विशेषांक काढला जातो. या अंकास अनेक मान्यवर संस्थांची पारितोषिके मिळाली असून, यावर्षी देखील पोर्ट ट्रस्ट कामगार दिवाळी विशेषांक काढला जाणार आहे. या अंकासाठी लेखक व कवी यांनी आपल्या कथा, लेख, कविता, कामगार चळवळ, राजकीय, आर्थिक, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, प्रवास वर्णन, चारोळ्या, वात्रटिका या विषयावर आपले साहित्य १५ ऑक्टोबर २०२४ पर्यंत मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियन, कामगार सदन, नवाब टँक रोड, माझगाव, मुंबई ४०००१० या पत्त्यावर पाठवावे. असे आवाहन अंकाचे कार्यकारी संपादक मारुती विश्वासराव यांनी केले आहे.

### युनिव्हर्सिटी ऑफ वोलोंगॉन्गची शिष्यवृत्ती

**मुंबई:** युनिव्हर्सिटी ऑफ वोलोंगॉन्ग इंडिया (UOW India), भारतात अध्यापन केंद्र स्थापन करणाऱ्या पहिल्या उच्च रँकिंग ऑस्ट्रेलियन विद्यापीठांपैकी एक असून, या युनिव्हर्सिटीने आज त्यांच्या आगामी नोव्हेंबरमधील विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी 'द इनऑग्रल स्कॉलरशिप' ची घोषणा केली. ही विशेष शिष्यवृत्ती संगणकीय आणि फिनटेक प्रोग्रामसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण आर्थिक लाभ देईल. नोव्हेंबर २०२४ मध्ये युनिव्हर्सिटी ऑफ वोलोंगॉन्ग इंडियामध्ये मास्टर ऑफ कम्प्युटिंग (डेटा ॲनालिटिक्स), कॉम्प्युटिंगमधील पदवी प्रमाणपत्र, मास्टर ऑफ फायनान्शियल टेक्नॉलॉजी, विस्तारित मास्टर ऑफ फायनान्शियल टेक्नॉलॉजी आणि ग्रॅज्युएट सर्टिफिकेट ई-फायनान्शियल टेक्नॉलॉजी यासह अनेक पदवी आणि पदव्युत्तर कार्यक्रम सुरू होणार आहेत. हे कार्यक्रम विकसित होत असलेल्या जागतिक जॉब मार्केटच्या मागण्यांना साजेसे करण्यासाठी आणि वेगाने बदलणाऱ्या जगात यश मिळविण्यासाठी आवश्यक कौशल्ये व विद्यार्थ्यांना सुसज्ज करण्यासाठी काळजीपूर्वक डिझाइन केलेले आहेत. अर्ज करण्यासाठी विद्यार्थ्यांना पदवीपूर्व पदवी किंवा संबंधित कामाचा अनुभव व इंग्जी भाषेचे समाधानकारक मूल्यांकन आवश्यक असेल.

#### वाढवण बंदर प्रकल्पात 4 लाख रोजगार उपलब्ध होणार

# स्थानिकांना रोजगारात प्राधान्य आणि मासेमारी करणाऱ्यांना उद्योग मिळवून देणार - रामदास आठवले

प्रतिनिधी
■ पालघर



वाढवण बंदर प्रकल्प 76 हजार कोटी रुपयांचा प्रकल्प असून यात 4 लाख रोजगार उपलब्ध होणार आहे .या प्रकल्पात स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार प्राधान्य मिळवून देणार असून येथे मासेमारी करणाऱ्यांचे पुनर्वसन करण्यासाठी त्यांना चांगला रोजगार मिळवून देण्यासाठी आपण केंद्रीय मंत्री सर्वानंद सोनोवाल यांची भेट घेणार आहोत.त्यामुळे वाढवण बंदर प्रकल्पाला सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी केले.

पालघर जिल्ह्यातील डहाणू येथे आज 330 दीव्यांग जणांना मोफत सहाय्यक उपकरण आणि व्हीलचेअर चे वाटप ना रामदास आठवले यांच्या हस्ते करण्यात आले.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 75 वाढदिवसा निमित्त केंद्रीय सामाजिक न्याय मंत्रालय दिव्यांग सक्षमीकरण विभागातर्फे देशभरात 75 ठिकाणी दिव्यांग जणांना मोफत सहाय्यक उपकरणांचे वाटप करण्याचे शिबिर आयोजित करण्यात आले होते त्या अंतर्गत आज डहाणू येथे ना.रामदास आठवले यांच्या हस्ते दिव्यांग जणांना मोफत व्हीलचेअर चे वाटप करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते यावेळी विचार मंचावर पलघर चे खासदार हेमंत सावरा; जिल्हा अधिकारी गोविंद बोडके, जिल्हा परिषद सी ई ओ भानू पालवे, अलिमको चे वरिष्ठ व्यवस्थापक विकास शर्मा, गीते; समाज कल्याण सहाय्यक आयुक्त समाधान इंगळे, जिल्हा परिषद चे समाज कल्याण अधिकारी भावसार, कोळी, भाजपचे जिल्हा अध्यक्ष भरत राजपूत, पंकज गोरे, रिपाइं जिल्हा अध्यक्ष सुरेश जाधव, सचिन लोखंडे आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी विश्वात सर्वाधिक लोकप्रिय नेते ठरले आहेत .प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अपंगाना दिव्यांग ही संज्ञा दिली. मोदी सरकार ने दिव्यांग जणांना शिक्षणात 4 टक्के वरून 5 टक्के आणि नोकरीत 3 टक्के हून 4 टक्के आरक्षण वाढवून दीले आहे . दिव्यांग जणांचा अपमान होऊ नये त्यांना सन्मान मिळावा यासाठी समाजाने ही दक्ष आणि तत्पर रहिले पाहीजे.केंद्र सरकार सामाजिक न्याय मंत्रालयाने दिव्यांग जणांसाठी दिव्यांग सक्षमीकरण विभाग सुरू केला असून त्यास स्वतंत्र सचिव आहे .सामाजिक न्याय मंत्रालय केंद्र सरकार ने दिव्यांग जणांसाठी सुगम्य भारत योजना सुरू केली आहे .त्या अंतर्गत सर्व विमानतळ; रेल्वे स्टेशन; सार्वजनिक कार्यालय इमारती शाळा या दिव्यांग जणांना सुगम केल्या आहेत.असे ना. रामदास आठवले यावेळी म्हणाले.

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करून लोकांना स्वातंत्र्य चळवळी साठी एकत्र करण्याचा प्रयत्न केला.महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातून सर्व धर्म समभाव ची शिकवण दीली. त्यानुसर सर्वांनी एकमेकांच्या धार्मिक उत्सवात सहभागी व्हावे असे सांगत अनंत चतुर्दशी च्या ना. आठवले यांनी शुभेच्छा दिल्या.

#### गणपती गेले गावाला ; चैन पडेना आम्हाला

# वसईत अकरा दिवसांच्या 3550 गणेशमूर्त्यांचे विसर्जन

## मिरवणुकीत नियमांचे उल्लंघन



प्रतिनिधी
■ वसई

महाराष्ट्राचे लाडके आराध्य दैवत असलेल्या श्री गणरायांना मंगळवारी अनंत चतुर्दशी निमित्त साश्रुनयनांनी निरोप देण्यात आला. अकरा दिवसांच्या साडे तीन हजार बाप्पांचे १०५ विसर्जन स्थळे व कृत्रिम तलावात विसर्जन करण्यात आले. अकरा दिवसांच्या ३५० सार्वजनिक तर ३२०० खाजगी बाप्पांना यावर्षी निरोप देण्यात आला.यावेळी पोलीस आणि वाहतूक पोलिसांचा मोठा फौजफाटा विसर्जनाला तैनात होता.

महापालिकेने बाप्पांच्या विसर्जनासाठी १०५ ठिकाणी व्यवस्था केली होती. त्यात आनंदाने व भक्तिभावाने बाप्पांचे विसर्जन करण्यात आले. दरम्यान, बाप्पांच्या मिरवणुकीत नियमांचे मोठ्या प्रमाणात उल्लंघन झाल्याचे चित्र दिसून आले. डिजेवर बंदी असताना कर्णकर्कश आवाजात डीजेच्या तालावर रात्री उशिरापर्यंत गणरायांचे विसर्जन करण्यात आले. तसेच पोलीस असताना नियमांचे उल्लंघन भाविकांकडून झाल्याचे दिसून आले. यंदा तालुक्यात ३१ हजार ७०८ गणराय विराजमान झाले होते. त्यापैकी शेवटच्या बाप्पांचे मंगळवारी विसर्जन संपन्न झाले. गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या... गणपती गेले गावाला... चैन पडेना आम्हाला... अशा जयघोषात बाप्पांना अनंत चतुर्दशी निमित्त भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला.

### बाप्पा वाढले, तलाव पडले अपुरे...

*वसई- विरार परिसरात वर्षागणिक गणरायांची संख्या वाढत आहे. त्यामानाने गणरायांच्या विसर्जनासाठी तलावांची संख्या मात्र अपुरी पडू लागली आहे. मंगळवारी बाप्पांना निरोप देण्यासाठी सार्वजनिक तलावांच्या ठिकाणी भाविकांच्या अक्षरशः रांगा लागल्या होत्या. मोठ्या मुर्त्यांचे खाडी, समुद्र, खदानित विसर्जन झाले, तर यंदा पालिकेने ठिकठिकाणी कृत्रिम तलावांची व्यवस्था असल्याने नागरिकांनी मोठ्या प्रमाणात या कृत्रिम तलावांना प्रतिसाद दिला. मात्र काही भाविकांनी शहरातील सार्वजनिक तलावात बाप्पांचे विसर्जन केले. मात्र गणरायांची संख्या अधिक असल्याने आहेत ते तलाव अपुरे पडल्याचे चित्र दिसून आले. त्यामुळे भविष्यात वाढत्या गणरायांची संख्या व सार्वजनिक तलावांची अपुरी संख्या यामुळे भाविकांची अडचण होणार आहे. तसेच सार्वजनिक तलावांच्या ठिकाणी बाप्पांच्या विसर्जनासाठी भाविकांच्या रांगा लागल्याने पालिका व पोलिसांची देखील दमछाक झाल्याचे दिसून आले.*

### विरारमध्य विसर्जनावेळी तरुणाचा बुडून मृत्यू

*मंगळवारी संध्याकाळी विरारमधील टोटाले तलावात गणरायांचे विसर्जन करताना एका २४ वर्षीय तरुणाला फिट येऊन तलावात पडल्याने त्याचा बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. अमित सतीश मोहिते असे या दुर्दैवी तरुणाचे नाव आहे. तो विरारच्या फुलपाडा परिसरात राहत होता.दरम्यान, तो बुडत असताना पालिका व पोलीस कर्मचाऱ्यांनी त्याला वाचविण्याचा प्रयत्न केला नसल्याचा आरोप सदर तरुणाच्या कुटुंबियांनी केला आहे. विरार पोलीस ठाण्यात याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.*

#### आधीच उल्हास त्यात फाल्गून मास

# ट्रान्सफॉर्मर बिघाडीमुळे वसईकरांवर भारनियमाचे संकट

प्रतिनिधी
■ पालघर

ऐन गणेशोत्सवात भाविकांना तसेच नागरिकांना आणि व्यवसायिकांना विजेच्या खेळखंडोब्याचा सामना करावा लागल्याने भाविक व व्यवसायिकांत नाराजचे वातावरण असताना आता ट्रान्सफॉर्मर बिघाडीमुळे पुढील 4 ते 5 दिवस नागरिकांना भारनियमनाचा सामना करावा लागणार आहे. विजेच्या खेळखंडोब्यामुळे आधीच वसईकर त्रस्त असताना 4-5 दिवसाच्या भारनियमनामुळे आधीच उल्हास त्यात फाल्गून मास असे म्हणण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

महाराष्ट्र राज्य महापारेषण कंपनी, वसई येथील 100/22 केव्ही अतिउच्चदाब केंद्रातील 50 एमव्ही पावर ट्रान्सफॉर्मर दि.17 सप्टेंबर रोजी सकाळी नादूरूस्त झाला आहे. त्यामुळे त्याठिकाणी नवीन ट्रान्सफॉर्मर उपलब्ध होऊन विज पुरवठा पूर्ववत होईपर्यंत वसई- विरार भागातील नागरिकांना पुढील 4 ते 5 दिवस भारनियमनाल सामोरे जावे लागणार असल्याचे प्रसिद्ध पत्रक महावितरणच्या अधीक्षक अभियंता, वसई मंडळ यांनी जाहीर केले आहे. त्यामुळे 4 ते 5 दिवस आणखी विजेच्या खेळखंडोब्याचा नागरिकांना सामना करावा लागणार आहे.

गणेशोत्सवात भाविकांना व व्यवसायिकांना भारनियमनाचा सामना करावा लागल्याने त्यांच्यात आधीच नाराजीचे वातावरण आहे. त्यात पुढील 4 ते 5 दिवस अजून भारनियमनाला सामोरे जावे लागणार असल्याने ग्राहकांत आधीच उल्हास त्यात फाल्गून मास नाराजीचा सूर आळवला जात आहे. भारनियमनामुळे पाणी पुरवठ्यावरदेखील परिणाम होणार असल्याने नागरिकांना चिंता लागून राहीली आहे.

#### अनंत चतुर्दशी निमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा पालघर शहरात अनोखा उपक्रम

# प्रत्येक मंडळाला दिले एक झाड



प्रतिनिधी
■ पालघर

दरवर्षी प्रमाणे यंदाही लाडक्या गणपती बाप्पाचा निरोप घेण्यासाठी पालघर शहरामध्ये मोठ्या प्रमाणात गणेश भक्तांची उपस्थिती होती. सर्वच राजकीय पक्षांकडून तसेच सामाजिक संघटनांकडून येणाऱ्या भाविकांच्या तसेच गणेश मंडळाच्या स्वागतासाठी स्वागतकक्ष उभे करण्यात आले होते.

ज्यामध्ये गणेश मंडळाचे स्वागत पुष्प, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन केले जात असल्याची वर्षानुवर्षे चालत असलेली प्रथा सोडून प्रत्येक मंडळाला एक झाड देण्यात आले. जेणेकरून वाळवंटीकरणाच्या दिशेने सरकत असलेल्या महाराष्ट्राचा भूभाग पुन्हा एकदा सुजलाम सुफलाम होताना दिसावा यासाठीचा हा एक छोटा उपक्रम महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहर अध्यक्ष निशांत धोत्रे आणि त्यांच्या संपूर्ण टीमने हाती घेतला होता. या स्तुत्य उपक्रमाचे सर्वच स्तरांतून कौतुक होत आहे. भविष्याचा विचार करणाऱ्या युवा पिढीची महाराष्ट्राला गरज असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# पालिकेचा पुन्हा शिलोत्तरमधील अवैध बांधकामांना दणका

## किरकोळ बांधकामांवर कारवाई; मोठ्या बांधकामांना संरक्षण का?

प्रतिनिधी
■ वसई

विरार शहर महानगरपालिका हद्दीतील अनेक अनधिकृत बांधकामांना राजकीय संरक्षण असल्याचे आता लपून राहीलेले नाही. त्यामुळे अशा अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यास महापालिका हात आखडता घेत आहे. दरम्यान, शिलोत्तर परिसरात काही भूमाफियांनी उपायुक्त अजित मुठे यांना धक्काबुक्की केली होती. त्यानंतर संतप्त उपायुक्त मुठे यांनी शिलोत्तरमधील सुमारे 80 ते 90 हजार चौरस फुटावरील अनधिकृत बांधकामं निष्कासित केली होती. त्यानंतर गणेशोत्सवात आता पुन्हा त्याच ठिकाणी अनधिकृत बांधकामं उभी राहील्याचे कळताच, महापालिकेने संबंधित अनधिकृत बांधकामांवर कारवाई करून सुमारे 22 हजार चौरस फुटावरील विट बांधकाम व 12 पत्राशेड बांधकामं निष्कासित केली.

पालिकेच्या या कारवाईचं कौतुक होत असलं तरी किरकोळ अनधिकृत बांधकामांवर कारवाईची मर्दुमुकी दाखवणारे पालिका अधिकारी मोठ्या बांधकामांसंदर्भात मूग गिळून का गप्प राहतात? असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. अनधिकृत बांधकामांवर राजकीय दबाव तसेच आर्थिक वसुल्यांची गणितं समोर ठेवून त्यावर कारवाया केल्या जात



नसल्याने अनधिकृत बांधकामांचा आलेख वाढत चालला आहे. दरम्यान, शिलोत्तरमधील अनधिकृत बांधकामं ही पालिका अधिकाऱ्याला धक्काबुक्की केल्याने तिथल्या तिथेच नेस्तनाबूत केली जातात. मात्र इतर मोठ्या अनधिकृत बांधकामांसाठी पायघड्या पसरल्या जात आहेत.

मंगळवारी पालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने शिलोत्तरमध्ये धडक कारवाई केली. मात्र या कारवायांतून पालिकेचे कौतुक करून चालणार नाही. तर राजकीय दबाव झुगारून अनधिकृत बांधकामांवर कारवाया करता आल्या पाहिजेत, तरंच ते अधिकारी कौतुकास पात्र ठरतील. असा चिमटा नागरिकांनी पालिकेला काढला आहे.

# डबेवाले कामगारांच्या घरांच्या किंमत कमी करण्याची मागणी

प्रतिनिधी
■ वसई

दिवे अंजूर गाव ता. भिवंडी जि. ठाणे येथे ४६ एकर जागेत पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत १२,००० घरे मंजूर करण्यात आली आहेत. या प्रकल्पासाठी लागणारी सर्व प्रक्रिया म्हाडा मार्फत पूर्ण केली जाणार असून, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासाठी शासनामार्फत आवश्यक ती सर्व मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. सदर गृहप्रकल्प पब्लिक प्रायवेट पार्टनरशिप तत्वावर करण्यात येणार असून, डबेवाल्यांना ५०० चौ. फुटांची ५००० घरे देण्यात येणार आहे. त्यांची किम्मत २५ लाख



रूपये सांगितली गेली आहे. ही किंमत कमी करण्याची मागणी सरकारकडे करण्यात आली आहे. डबेवाला कामगार यांचे मासिक उत्पन्न १५ ते २० हजार... आणि सरकार त्याला घर देणार २५ लाख रूपयाचे, २५ लाख रूपये तो कोठून आणणार ? कोणतीही बॅन्क त्यांना कर्ज देणार नाही आणि कर्ज जरी दिले तरी ते कर्ज तो फेडणार कसे ? हे २५ लाखाचे घर मुंबईत नाही तर दिवे-अंजुर गाव ता. भिवंडी जि. ठाणे येथे आहे तेथे स्टेशन पासुन १० ते १२ किलोमिटर इतके लांब आहे.. डबेवाला कामगाराला ते गैरसोईचे आहे. इकडे मुंबईत म्हाडा "अल्प उत्पन्न गटात" २५ लाखात घर देते आहे. त्यासाठी लॅाटरी काढत आहे, आणि तिकडे डबेवाल्यांना दिवे-अंजुर ता. भिवंडी येथे २५ लाखात घर देते आहे.. मग डबेवाल्यांनाच २५ लाखात "अल्प उत्पन्न गटात" मुंबईत सरकार घर देऊ शकत नाही का ? डबेवाला कामगार यांचे उत्पन्न लक्षात घेता... गिरणी कामगारांना ज्या अल्प दरात साधारणता १० ते १२ लाखात घरे दिली त्या प्रमाणे डबेवाला कामगाराला सरकारने १० ते१२ लाखात घरे उपलब्ध करून द्यावीत. अशी मागणी " मुंबई डबेवाला असोशिएशन" चे अध्यक्ष सुभाष तळेकर यांनी राज्य सरकार कडे केली आहे.

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

रोज वाचा
वृत्तमानस

### पब्लिक नोटीस

याद्वारे नोटीस देण्यात येते की, गांव मौजे बोळींज, तालुका वसई, जिल्हा : पालघर येथील सम्राट मिलेनियम पॅराडाईस मधील फ्लॅट नं. जे/४०१, चौथा मजला असा फ्लॅट श्री. के. मल्लिकार्जुन व सौ. विशाला एस. कल्याणशेट्टी यांच्या मालकीचा असून श्री. के. मल्लिकार्जुन हे दिनांक ०४/१२/२०१३ रोजी मयत झालेले आहेत व त्यांच्या मृत्यूनंतर वक्षा मल्लिकार्जुन कल्याणशेट्टी (पत्नी) व विशाला एस. कल्याणशेट्टी (आई) असे वारस आहेत.

विशाला एस. कल्याणशेट्टी यांनी दिनांक २४/०८/२०१५ रोजीच्या कराराने सदर फ्लॅट वक्षा मल्लिकार्जुन कल्याणशेट्टी यांना कायमचा विक्री केलेला आहे व आता वक्षा मल्लिकार्जुन कल्याणशेट्टी ही सदर फ्लॅटची एकमेव मालक आहे, तरी सदर फ्लॅटवर अगर त्याचे एखादया भागावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा वारसा हक्क, हिस्सा, दावा असल्यास त्यांनी तो निम्नस्वाक्षरीकारांना त्यांच्या १११, पहिला मजला, कपाडीया हाऊस गावठण, विरार प., ता. वसई, जि. पालघर येथील कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झालेच्या तारखेपासून १४ दिवसाचें आंत सर्व कागदपत्रासहित लेखी कळवावा, तसे न केल्यास तशा प्रकारचा कोणाचाही कसल्याही प्रकारे हक्क, हितसबंध नाही असे समजून किंवा कोणाचा असल्यास तो सोडून देण्यात आला आहे असे समजण्यात येईल.

कळावे.

आपला विश्वासू
आर. टी. पाठक
वकील
दिनांक १९/०९/२०२४

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, हरीश्चंद्र जगन्नाथ पोवळे प्रो. महेंद्र टेक्सटाइल्स स्टोर्स कंपनी यांच्या मालकीचा न्यू शास्त्री इंडस्ट्रीयल सहकारी संस्था मर्यादित, पत्ता. गाव खारी, भाईंदर (पूर्व), ता व जि ठाणे ४०११०५ या संस्थेमध्ये ए/२ व ए/५ ह्या क्रमांकाचे औद्योगिक गाळे आहेत. ते सदर संस्थेचे सभासद आहेत. ते दि.०१/०९/१९८९ रोजी मरण पावले. त्यांच्या पत्नी तारामाती हरीश्चंद्र पोवळे दि.३१/१२/२०११ रोजी मरण पावल्या. त्यांचा मुलगा महेंद्र हरीश्चंद्र पोवळे दि.२७/०८/१९८९ रोजी मरण पावला. त्यांचा मुलगा सुनील हरीश्चंद्र पोवळे दि.०९/०९/२००० मरण पावला. त्यांचा मुलगा नरेंद्र हरीश्चंद्र पोवळे दि.२५/०६/२०२२ रोजी मरण पावला. त्यांची सून लीना नरेंद्र पोवळे दि.०१/०७/२०२४ रोजी मरण पावली. त्यांच्या पछयात त्यांची मुलगी वंदना हरीश्चंद्र पोवळे (लग्नानंतरचे नाव वंदना एस. पाटील) आणि स्वाती हरीश्चंद्र पोवळे (लग्नानंतरचे नाव स्वाती यु. नाचणकर) व सून स्मिता सुनील पोवळे या वारस आहेत. सदर वारसांनी मला वरील औद्योगिक गाळ्यांचे नो क्लेम सर्टिफिकेट देण्याची विनंती केली आहे.

तरी सदर औद्योगिक गाळयांवर, त्याच्या शेअर्सवर कुणाचाही हक्क, हितसबंध, गहाणवट, वारसाहक्क वगैरे असल्यास तसेच वरील वारसांना नो क्लेम सर्टिफिकेट देण्यास कुणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाचे आत लेखी, योग्य त्या कागदपत्रासह ऑफिस क्र.२, पहिला मजला, न्यू शांती गंगा अपार्टमेंट, स्टेशन रोड, भाईंदर (पू), ता. व जिल्हा ठाणे, ४०११०५ येथे कळवावे. दिलेल्या मुदतीत कळविण्यात न आल्यास वरील औद्योगिक गाळयांवर, शेअर्सवर, करारनाम्यावर कुणाचाही हक्क, हितसबंध नाही असल्यास तो सोडून देण्यात आला आहे. असे समजून नो क्लेम सर्टिफिकेट देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

कळावे,

जॉन एम रॉड्रीक्स
वकील
मो. नं. - ९८९२४०१३४९

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies**

**Year - Twenty Nine**
**Issu - 89**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - ८९**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**



*मुंबई: आमदार सुनिल प्रभू यांना उत्कृष्ठ संसदपटू पुरस्कार मिळाल्याबद्दल शिवसेना ग्राहक संरक्षण कक्ष, दिंडोशी विभागातर्फे सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी युवासेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्ष कोअर कमिटी मेम्बर अंकीत प्रभू, शिवसेना ग्राहक संरक्षण कक्ष समन्वयक संजय पावले, कक्ष विधानसभा संघटक, ऍड. हर्षल साळवी, कक्ष विधानसभा प्रसारक अमित चव्हाण, कक्ष उपसंघटक प्रकाश घोगळे, स्वप्नील नलावडे, संदीप राजपूरकर,कक्ष वॉर्ड संघटक राजेश मिरगुले, अजेश रिकामे, कक्ष प्रतिनिधी प्रथमेश आंगणे, महेश पावसकर, सूचक वाडकर, उदय पवार, निलेश चौबे, दीपेश गायकर आदी मान्यवर उपस्थित होते.*

# श्रीगणेश विसर्जन जल्लोषात; 'लालबागच्या राजा'ला दोन तास उशिराने निरोप

## मुंबईत ३७,३२६ गणेशमूर्तींचे आणि २०८ गौरीं/हरतालिका यांचे विसर्जन

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबापुरीत गणेश चतुर्थी दिनी सुखकर्ता आणि दुःखहर्ता श्री गणरायाचे आगमन झाले होते. गेले दहा दिवस भक्तांच्या सान्निध्यात मुक्काम केल्यावर मंगळवारी अनंत चतुर्दशी दिनी लाडक्या गणेशाला फटाके फोडत, गुलाल आणि फुलांची उधळण करीत, नाशिक ढोल - ताशा यांच्या तालावर नाचत आणि " गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' असा जयघोष करीत आनंददायी वातावरणात, जल्लोषात निरोप देण्यात आला. यावेळी, दादर, गिरगाव, माहिम अशा विविध चौपाट्या, पवई, शितल या नैसर्गिक तलावांच्या ठिकाणी लाखो भक्तांच्या गर्दीचा महासागर लोटला होता. काही किरकोळ समस्या, अडचणी वगळता मुंबईत शहर आणि उपनगर भागात श्री गणेशमूर्तींचे निर्विघ्नपणे आणि भावपूर्ण वातावरणात विसर्जन करण्यात आले.



दरम्यान, बुधवारी दुपारी ३ वाजेपर्यंत ६९ नैसर्गिक आणि २०४ कृत्रिम तलाव अशा एकूण २७३ विसर्जन स्थळी ६,३१५ सार्वजनिक गणेशमूर्तींचे आणि ३१,०११ घरगुती गणेशमूर्तींचे असे एकूण ३७,३२६ गणेशमूर्तींचे आणि २०८ गौरी / हरतालिका यांचे विसर्जन करण्यात आले. या एकूण ३७,३२६ विसर्जित गणेशमूर्तींमध्ये, गिरगाव, दादर, माहिम आदी चौपाट्या आणि पवई, शितल तलाव आदी ६९ नैसर्गिक विसर्जन स्थळी विसर्जित ५,७४१ सार्वजनिक गणेश मूर्तींचा आणि २०,२६५ घरगुती अशा एकूण २६,००६ गणेश मूर्तींचा समावेश आहे. तसेच, एकूण विसर्जित २०८ गौरी / हरतालिका यांमध्ये नैसर्गिक स्थळी विसर्जित १६४ गौरी/ हरतालिका यांचा समावेश आहे.

तसेच, या एकूण ३७,३२६ विसर्जित गणेशमूर्तींमध्ये, २०४ कृत्रिम तलावांच्या ठिकाणी विसर्जित ५७४ सार्वजनिक गणेशमूर्तींचा आणि १०,७४६ घरगुती गणेशमूर्तींचा अशा एकूण ११, ३२० विसर्जित गणेशमूर्तींचा समावेश आहे. तसेच, एकूण विसर्जित २०८ गौरी / हरतालिका यांमध्ये कृत्रिम तलावात विसर्जित ४४ गौरी/ हरतालिका यांचा समावेश आहे.

श्री गणेशाला भावपूर्ण निरोप देण्यासाठी व गिरगाव चौपाटी येथील विसर्जन सोहळ्याचा आनंद लुटण्यासाठी दरवर्षीप्रमाणे राज्याचे राज्यपाल, मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री हे उपस्थिती दर्शवित असतात. त्यानुसार, यंदा नवनियुक्त राज्यपाल सी.पी.राधा कृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह मंत्री, राज्यमंत्री, खासदार, आमदार, नेते मंडळी आदींनी गिरगाव चौपाटी येथे मुंबई महापालिकेने उभारलेल्या भव्य शामियानात आपली उपस्थिती दर्शवली. तसेच, यावेळी राज्यपाल, मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री यांनी, भव्य गणेशमूर्तींवर पुष्पवृष्टी करून बाप्पाला निरोप दिला.

मुंबई शहर आणि उपनगर येथे मंगळवारी सकाळपासूनच गणरायाला निरोप देण्यासाठी प्रसिद्ध सार्वजनिक मंडळात, सोसायटीमध्ये, झोपडपट्टी, चाळींमधील घराघरात भक्तांची धावपळ सुरू होती. मुंबईचा राजा गणेश गल्लीतील गणपती बाप्पाची मंगळवारी सकाळी आठ वाजता मंडळातील भक्तगणांनी मनोभावे आरती, पूजाअर्चा करून लगेचच विसर्जन मिरवणुकीला सुरुवात केली. त्यानंतर लालबागच्या राजाच्या विसर्जन मिरवणुकीला सुरुवात करण्यापूर्वी लालबागच्या राजाचीही मनोभावे पूजा आणि आरती करण्यात आली. मंगळवारी दुपारी १२.३० वाजताच्या सुमारास लालबागच्या राजाच्या विसर्जन मिरवणुकीची अंतिम तयारी पूर्ण करण्यात आली. त्यानंतर विसर्जन मिरवणुकीला प्रारंभ करण्यात आला.

यावेळी, लालबाग , परळ, भायखळा आदी भागात गणेश भक्तांनी हजारोंच्या संख्येने गर्दी केली होती. रात्री साडेआठ वाजताच्या सुमारास मुंबईचा राजा गणेश गल्लीचा राजा याची विसर्जन मिरवणूक गिरगाव चौपाटी परिसरात पोहोचली होती. तर, रात्री ९.१५ वाजताच्या सुमारास लालबागचा राजाची मिरवणूक ही बकरी अड्डा येथे पोहोचली होती. दरम्यान, लालबागचा राजा, मुंबईचा राजा आदी भव्य गणेश मूर्तींचे चौकाचौकात, ठिकठिकाणी पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. लालबागच्या राजाचे सकाळी ७.४५ वाजता गिरगाव चौपाटीवर आगमन होणे व त्यानंतर त्याचे खोल समुद्रात विसर्जन होणे अपेक्षित होते. मात्र एन. एम. जोशी मार्ग येथे एमएमआरडीए यांच्या कामामुळे निर्माण झालेल्या अडथळ्यांमुळे लालबागच्या राजाचे आरती, पूजन करून गिरगाव चौपाटी येथील खोल समुद्रात विसर्जन करण्यासाठी तब्बल दोन तास उशीर झाला. याबाबत महापालिका व एमएमआरडीए यांच्या ढिसाळ नियोजनाबाबत काही कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे, अशी माहिती बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीचे अध्यक्ष ऍड. नरेश दहीबावकर यांनी दिली ते याप्रकरणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे तक्रार दाखल करणार आहेत.

**चोख पोलीस बंदोबस्त**

*श्रीगणेश विसर्जन निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी राज्य शासनाने मुंबईतील मुख्य विसर्जन स्थळी, रस्त्यांवर, चौकांत, संवेदनशील ठिकाणी कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवला होता. गृह खात्याने, एसआरपीएफ, क्यूआरटी, फोर्स वनची अतिरिक्त कुमक, होमगार्ड, स्वयंसेवी संस्थांचे स्वयंसेवक, स्वतः पोलीस आयुक्त, ८ अतिरिक्त पोलीस आयुक्त, ४० पोलीस उप आयुक्त, ५० साहाय्यक पोलीस आयुक्त, २,९०० पोलीस अधिकारी, २०,५०० पोलीस कर्मचारी, एस. एस.पी. एफच्या प्लाटून , शीघ्र कृती दलाची तुकडी, दंगल नियंत्रण पथक आदी मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. सुरक्षिततेच्या दृष्टीने गिरगाव चौपाटी येथे ड्रोन आणि हेलिकॉप्टर यांचा वापर करण्यात आला.*

## अभ्युदयनगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा

# निविदा प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

## ६३५ चौ.फूटापेक्षा जास्त क्षेत्रफळाची सदनिका
## सदनिकाधारकाला वाहन पार्किंगची सुविधा

प्रतिनिधी
■ मुंबई

अभ्युदयनगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाची निविदा प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज प्रशासनाला दिले. यामुळे आता अभ्युदय नगर म्हाडा वसाहत पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे.



विधानपरिषद सदस्य प्रविण दरेकर यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे बैठक घेतली होती. त्यावेळी हे निर्देश दिले. या बैठकीला गृहनिर्माण मंत्री अतुल सावे (दूरदृष्यप्रालीद्वारे), विधानपरिषद सदस्य प्रसाद लाड, गृहनिर्माण विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव वल्सा नायर सिंह, म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जयस्वाल, मुख्याधिकारी मिलींद बोरीकर, उपसचिव अजित कवडे, अवर सचिव अरविंद शेटे, अभ्युदय नगर सहकारी गृहनिर्माण संस्था महासंघाचे माजी अध्यक्ष नंदकुमार काटकर, उपाध्यक्ष विलास सावंत यांच्यासह सदस्य उपस्थित होते.

बैठकीत उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रकल्पातील रहिवाशांच्या मागण्या जाणून घेतल्या. अभ्युदय नगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकास प्रकल्पाची निविदा काढतांना त्यामध्ये सदनिकेचे क्षेत्रफळ हे ६३५ चौरस फूट पेक्षा जास्त असावे, भविष्याच्यादृष्टीने सदनिकाधारकाला चारचाकी वाहन पार्किंग असावी, सदनिकेची किंमत खुल्या बाजारभावानुसार असावी अशा अटी समाविष्ट करण्याच्या सूचना दिल्या. शासनाच्या उच्चाधिकार समितीची मान्यता घेवून पुनर्विकास प्रकल्पाची निविदा लवकरात लवकर काढा, असे निर्देश उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले.

विधानपरिषदेचे सदस्य प्रविण दरेकर यांनी अभ्युदय नगर पुनर्विकासासाठी राज्य शासन घेत असलेल्या निर्णयाबाबत शासनाचे विशेषत: उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले. या निर्णयामुळे सुमारे अभ्युदय नगर वसाहतीतील १५ हजार रहिवाशांना फायदा होणार आहे. या निर्णयामुळे मुंबईतील मराठी माणूस, कामगार आनंदी असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

अभ्युदय नगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासासाठी रहिवाशांनी स्ट्रक्चरलचे पैसे भरले आहेत. हा पुनर्विकास प्रकल्प पथदर्शी प्रकल्प म्हणून ओळखला जावा. काँक्रीटचे जंगल न होता चांगले काम व्हावे अशी मागणी करुन शासनाच्या क्रांतीकारक निर्णयांचे कौतुक महासंघाच्या प्रतिनिधींनी यावेळी केले. म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांनी अभ्युदय नगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकास प्रकल्पाचे सादरीकरण करुन प्रकल्पाविषयी माहिती दिली.



*मुंबई: खासदार झाल्यानंतर भीम आर्मी संस्थापक खासदार ऍड:चंद्रशेखर आजाद भाई यांनी मुंबई चैत्यभूमी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी पोहचले तसेच चैत्यभूमीचे संस्थापक यशवंतराव आंबेडकर यांना ही अभिवादन केले. आणि मीडियाशी संवाद साधला.*

# प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती पालिकेत साजरी

प्रतिनिधी
■ मुंबई

संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील अग्रणी, समाजसुधारक, विचारवंत, लेखक व प्रभावी वक्ते केशव सीताराम ठाकरे ऊर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त महापौर दालनातील केशव सीताराम ठाकरे ऊर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या



प्रतिमेस 'ए' विभागाचे सहाय्यक आयुक्त जयदीप मोरे यांनी महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने मंगळवारी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

याप्रसंगी महानगरपालिका उप सचिव श्रीमती प्रियांका देसाई उपस्थित होत्या.

# लोकल ट्रेनमध्ये राहिलेली बॅग अर्ध्या तासात परत मिळाली

प्रतिनिधी
■ मुंबई

बेस्ट कामगार सेनेचे सक्रिय कार्यकर्ते शिवसेनेचे संपर्कप्रमुख गणेश शिंदे हे सोमवारी सपत्नीक आपल्या मुलासोबत बाहेरून येत असताना ठाणे स्थानकावर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे जाणाऱ्या ट्रेन मध्ये सायन येथील गुरू तेज बहादुर नगर येथे जाण्यासाठी बसले. स्टेशन आल्यानंतर ते सर्वजण उतरले आणि गाडी निघून गेली. उतरल्यावर त्यांच्या लक्षात आले की,आपल्या हातातील बॅग ट्रेन मध्येच राहिली, शिंदे यांनी लगेच सदर ट्रेनच्या मागून येणारी दुसरी ट्रेन पकडली आणि वडाळा रेल्वे पोलीस चौकीत संपर्क साधला त्यावेळी ड्युटीवर असणारे सचिन मांडले यांना त्यांनी माहिती दिली, त्यांनीही तत्काळ ड्युटीवर असलेल्या चार पोलिस कर्मचारी



वर्गाशी संपर्क साधला आणि पुढील दहा मिनिटात त्यांना फोन आला सदर बॅग ट्रेन मध्ये सापडली आहे. आणि गणेश शिंदे यांची ट्रेन मध्ये राहिलेली बॅग फक्त अर्ध्या तासात रेल्वे पोलीस कर्मचारी, अधिकारी वर्गाने शोधून काढली.

गणेश शिंदे यांनी सदर बॅग शोधून व्यवस्थित देणारे पोलीस कर्मचारी, अधिकारी सचिन मांडले योगेश शिर्के, तसेच सर्व रेल्वे पोलीस कर्मचारी अधिकारी वर्गाचे आभार मानले. अत्यंत हुशार आणि तल्लख बुध्दीने काम करणाऱ्या महाराष्ट्र रेल्वे पोलिस कर्मचारी वर्गाला त्यांनी सॅल्युट ठोकला आहे

# साहित्यिकांकडे नम्रता हवी, अहंकार नको! पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
■ मुंबई

जयवंत दळवी हे मला मित्र म्हणून नव्हे, तर स्पर्धक म्हणून भेटले. मात्र स्पर्धा बाजूला राहिली आणि स्नेह वृद्धिंगत झाला. साहित्यिकांकडे नम्रता असली पाहिजे, अहंकार नको, असे प्रतिपादन कोकण मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांनी केले.

ज्येष्ठ साहित्यिक स्वर्गीय जयवंत दळवी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त कोकण मराठी साहित्य परिषद, मुंबई जिल्हा आणि बोरिवली शाखेच्या वतीने बोरीवली येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

सोमवारी आयोजित या कार्यक्रमाचे अध्यक्षपद कोकण



मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, तर कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या आमदार मनीषाताई चौधरी होत्या. प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ नाटककार, अभिनेते अशोक समेळ होते आणि कोकण मराठी साहित्य परिषदेच्या केंद्रीय अध्यक्षा नमिता कीर आणि केंद्रीय कार्याध्यक्ष प्रा. डॉ. प्रदीप ढवळ यांची विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बोरीवली शाखेचे अध्यक्ष जगदीश भोवड यांनी केले. त्यानंतर बोलताना प्रा. ढवळ यांनी जयवंत दळवी यांच्या पहिल्या भेटीची अनोखी आठवण सांगितली. या शताब्दी वर्षात आणखी भव्य प्रमाणात कार्यक्रम घेण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

आपले मनोगत व्यक्त करताना नमिता कीर यांनी जयवंत दळवींच्या नाट्य आणि साहित्याची एकूणच संशोधनात्मक माहिती सादर केली. याप्रसंगी जयवंत दळवी यांचे चिरंजीव गिरीश दळवी यांनी अतिशय हळवी अशी बाबांविषयीची आठवण सांगितली.

ज्येष्ठ नाटककार अभिनेते अशोक समेळ यांनी दळवींच्या अनेक नाटकांविषयी साभिनय विवेचन केले. मधुभाई आणि दळवी आपली दैवते असल्याचे सांगितले. कोकण मराठी साहित्य परिषदेचे मुंबई जिल्हा अध्यक्ष डॉ. मनोज वराडे यांनी त्यांच्या मनोगतामध्ये दळवींच्या कादंबऱ्यांतील बारकाव्यांचे वर्णन करताना त्यांच्या ओघवत्या शैलीचे वैशिष्ट्य सांगितले.शेवटी मार्गदर्शन करताना मधुभाईंनी परममित्र दळवींच्या सोबत घालवलेल्या अनेक आठवणींना उजाळा दिला. त्याचप्रमाणे कोकण मराठी साहित्य परिषद हा एक परिवार असून त्या परिवाराने केशवसुतांचे स्मारक बांधल्याचा आवर्जून उल्लेख केला. तसेच श्री.ना. पेंडसे यांना पालखीतून गारंबी येथे नेल्याची आठवण सांगितली.

बोरीवली शाखेच्या माजी अध्यक्षा अनुराधा नेरुरकर यांनी खुमासदार शैलीत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले आणि दादर शाखेच्या अध्यक्ष विद्या प्रभू यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# मध्य रेल्वेवर 2 ऑक्टोंबर पर्यंत स्वच्छता ही सेवा अभियान



प्रतिनिधी
■ मुंबई

मध्य रेल्वेवर दि. १७ सप्टेंबर २०२४ रोजी 'स्वच्छता ही सेवा मोहीम २०२४' अधिकृतपणे सुरू करण्यात आली. २ ऑक्टोबर २०२४ पर्यंत चालणारी 'स्वच्छता ही सेवा मोहीम' स्वच्छतेचे आणि शाश्वत कचरा व्यवस्थापनावर भर देणार आहे. स्वच्छ भारत मिशनच्या १०व्या वर्धापन दिनानिमित्त या वर्षीची मोहीम विशेष महत्त्वाची आहे, जी देशभरातील स्वच्छता आणि स्वच्छता सुधारण्यासाठी सुरू असलेल्या वचनबद्धतेला अधोरेखित करणारं आहे.मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धरम वीर मीना, यांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मधील महाव्यवस्थापक कार्यालयातील प्रधान विभाग प्रमुख, मुख्यालय अधिकारी आणि कर्मचारी यांना स्वच्छता ही सेवा प्रतिज्ञा दिली.

'एसएचएस-२०२४' लाँच करण्याचा एक भाग म्हणून आणि Plant4Mother (एक पेड माँ के नाम) चा प्रचार करण्यासाठी, श्री मीना यांनी ११ महिलांच्या टीमकडे पिंपळ वृक्षाचे रोपटे सुपूर्द केले. व पर्यावरण आणि स्वच्छता जागृतीसाठी कार्यालयीन बागेत रोपटे लावण्यात आले. त्यामुळे स्वच्छता आणि पर्यावरणीय जबाबदारीची संस्कृती जोपासण्यावर मोहिमेचा भर अधोरेखित केला आणि नेतृत्वातील समावेशकता आणि पर्यावरण आणि स्वच्छता याविषयी जबाबदारीची सामूहिक मालकी यावर भर दिला.

मुख्यालय आणि सर्व विभागांमधील मध्य रेल्वेचे अधिकारी आणि कर्मचारी स्वच्छतेच्या प्रयत्नांसाठी वार्षिक १०० तास योगदान देणार आहेत, ज्यामध्ये दर आठवड्याला दोन तास ऐच्छिक कामाचा समावेश आहे. या उपक्रमाचा उद्देश स्वच्छता वाढवणे, जागरुकता वाढवणे आणि कुटुंब, समुदाय आणि कामाच्या ठिकाणी कृती करण्यास प्रेरित करणे हा आहे. संपूर्ण अभियानात जनजागृती कार्यशाळाही घेण्यात येणार आहेत.

# विसर्जनासाठी जाणाऱ्या भाविकांना पक्ष, संघटना, संस्थांकडून वडापाव, पाणी, अल्पोपहाराचे वाटप

प्रतिनिधी
■ मुंबई

गोरेगांव येथील २१ सेंचुरी वेलफेयर ट्रस्ट व सुंदर नगर रेसिडेंट्स वेलफेयर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने मागील 26 वर्ष सातत्याने गोरेगाव पूर्व पश्चिम परिसरातील गणेश मूर्ती विसर्जनासाठी जाणाऱ्या भाविकांना सकाळ पासून रात्रौ उशिरापर्यंत वडापावचे मोफत वाटप करण्यात येत असते. यंदाच्या वर्षी देखील गणेश भक्तांना वडापावचे वाटप करण्यात आले.



यावेळी शिवसेना उपनेते समीर देसाई , भाजपा आमदार विद्या ठाकूर, भाजपा नेते जयप्रकाश ठाकूर भाजपा माजी नगरसेवक दीपक ठाकूर , शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आमदार सुनील प्रभू, काँग्रेस च्या माजी नगरसेविका स्नेहा झगडे,शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते सुभाष देसाई , भाजपा माजी नगरसेविका प्रीती सातम , शिवसेना युवा सेना चिटणीस अमोल कीर्तीकर इत्यादी सर्वच पक्षाचे नेते मंडळी कार्यकर्ते गणेश भक्त व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मालाड पूर्व येथील प्रभाग क्रमांक 43 मध्ये हवा हीरा पार्क, संस्कार कॉलेज जवळ, कुरार गांव, येथे गणेश विसर्जनासाठी जाणाऱ्या गणेश भक्तांना भाजप माजी नगरसेवक विनोद मिश्रा यांच्या वतीने संध्याकाळी 4 वाजल्यापासून वडापाव चे वाटप करण्यात आले.

शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) शाखा क्र. 192 नगरसेविका प्रिती प्रकाश पाटणकर यांच्यावतीने संध्याकाळी 6 वाजल्यापासून आराम बिल्डिंग, अनुग्रह हॉटेल समोर, गोखले रोड, येथे गणेश विसर्जनानिमित्त खास गणेश भक्तांसाठी मोफत पाणी व अल्पोपहार वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



*मुंबई: अनंत चतुर्थी निमित्त नवघर रोड, मुलुंड (पूर्व) येथे मुलुंडच्या महाराजांचे दर्शन घेऊन माजी नगरसेवक प्रकाश गंगाधरे व भाजप कार्यकर्त्यांनी मिरवणुकीवर पुष्पवृष्टी केली.*

**पश्चिम रेल्वे**

**रिलीझ केलेले रेल्स,पीआरसी स्लिपर्स, टर्नआउट स्लिपर, क्रॉसिंग, स्विचेस इ. उचलणे**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डब्ल्यूए), पश्चिम रेल्वे, ६वा मजला, अभि. विभाग., मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८ हे मागवित आहेत ई-निविदा सूचना क्र. : बीसीटी/ २४-२५/ १६७, दि. १२.०९.२०२४. काम आणि ठिकाण : जोरावासण-सुरत विभाग : मंजूर कामे (१) विरार - सुरत - टीटीआर (टीडब्ल्यूएस डब्ल्यूसीएमएससी) - ६७ संच, टीटीआर (सीएस, सीएमएससी) - ३७ संच आणि सुधारीत एसईजेज् - ७५ नग. (२) विरार - सुरत (अप) - सीटीआर (पी) - ३.६१० टीकेएम (३) विरार - सुरत - टीआरआर (पी) ३.४१६ टीकेएम आणि टीएसआर (पी) -९.८८२ टीकेएम. यांच्याशी संबंधित सिनी. एडीईएन/ एसटी अंतर्गत रेल्वेच्या बीएफआर वर बसवलेल्या क्रेनच्या सहाय्याने रिलिझ केलेले रेल्स, पीआरसी स्लिपर्स, टर्नआउट स्लिपर्स, क्रॉसिंग्स, स्विचेस इत्यादी उचलणे. कामाचे अंदाजित मूल्य : रु. ७३,७२,९४१.६०, इरठे : रु १,४७,५००/-. सादर करण्याची तारीख व वेळ : दि. ०८.१०.२०२४ रोजी १५:०० वा. पर्यंत. उघडण्याची तारीख व वेळ : दि. ०८.१०.२०२४ रोजी १५:३० वा. अधिक तपशीलाकरीता कृपया www.ireps.gov.in वर भेट द्या. मॅन्युअल प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही. 0542

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly

**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

दुरध्वनी कार्यालय ०२२ - २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२ - २७४५५७५१ उपायुक्त कार्यालय : ०२२ - २७४५५७५१
ई-मेल : panvelcorportation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com
निविदा सुचना क्र.पमपा/बांधकाम /६५२४/प्र.क्र.- /३९२४/२०२४ दिनांक: १८/०९/२०२४

**शहर अभियंता विभाग**
**ई-निविदा सुचना**

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय / निम शासकीय (Central Government / State Government / Government under taking) विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पध्दतीनुसार ई-निविदा मागवित आहेत.

| अनु क्र | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMCCE/१९६/२०२४-२५ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-अ,खारघर, सेक्टर - १०, प्लॉट नं. २५१ वर सामाजिक सभागृह बांधणे. | १८,४०, ४०,६००/- |

या कामाच्या ई- निविदे बाबतची माहिती शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.20/०९/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

निविदा सुचना क्र.पमपा/बांधकाम /६५२४/प्र.क्र.- /३९२४/२०२४
दिनांक: १८/०९/२०२४

सही /-
अतिरिक्त आयुक्त-I
पनवेल महानगरपालिका

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**
महिला व बालकल्याण विभाग
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**निविदा सूचना क. ०१ सन - ( २०२४-२५)**

आयुक्त, कल्याण डोबिवली महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागामार्फत महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण मंडळाकडील नोंदणीकृत / मान्यताप्राप्त संस्था / केंद्र यांच्या कडून महिलांना खालील विविध स्वयंरोजगाराकरीता प्रशिक्षण देणेबाबतची १० कामे 'ई' -टेंडरिंग पध्दतीने दोन लिफाप्याद्वारे निविदा मागविणेत येत आहे.

१) इच्छुक ठेकेदारांना / संस्थाना www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावरुन ही निविदा खरेदी करुन भरता येतील.
२) निविदा अर्जाची विक्री दि. १९/०९/२०२४ ते दि.२५/०९/२०२४ पर्यंत दुपारी ४.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील.
३) निविदा भरण्याची दि. १९/०९/२०२४ ते दि. २५/०९/२०२४ पर्यंत दुपारी ४.०० वाजेपर्यंत राहील. ४) www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावरच विक्री व स्विकृती केली जाईल याची नोंद घ्यावी. तसेच प्राप्त निविदा दि. २६/०९/२०२४ स. ११.०० वाजता नागरी सुविधा केंद्र 'ई-टेंडरींग' विभागात उपस्थित निविदाकार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.
५) एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचे अधिकार मा. आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी राखून ठेवले आहेत.

जा.क्र. - कडोंमपा/ जसंवि/मुका /१६६७
दि. - १६/०९/२०२४

सही/-
(स्वाती देशपांडे)
उप आयुक्त (मबाकवि)
कल्याण डोंबिवली महानगरपालिका.

आकाशात इतके उंच उडा की खालून लोकांकडून फेकले जाणारे दगड तुमच्यापर्यंत येणार नाहीत.



- चेतन भगत
प्रसिद्ध लेखक

वृत्तमानस
मुंबई, गुरुवार, १९ सप्टेंबर २०२४

# तुम्ही माझी काळजी घ्या मी तुमची घेते

मुंबई आणि ठाणे खाडीचा प्रदेश महत्त्वाचा पक्षी क्षेत्र म्हणून ओळखला जातो. कारण ते विविध पक्षी प्रजातींचे निवासस्थान आहे. विशेषतः ते फ्लेमिंगो आणि इतर अनेक स्थलांतरित आणि दुर्मीळ पक्ष्यांची लोकसंख्या नियंत्रित व कायम ठेवते. मुंबई आणि ठाण्यासारख्या काँक्रीटच्या जंगलामध्ये १७ चौरस किलोमीटर क्षेत्रावर ही खाडी पसरली आहे. ही खाडी सुमारे २०० प्रजातींच्या पक्ष्यांचे माहेरघर आहे. यामध्ये बऱ्याच स्थलांतरित पक्ष्यांच्या प्रजातींचा समावेश आहे. या स्थलांतरित पक्षी प्रजातींमध्ये रोहित म्हणजेच फ्लेमिंगो हा पक्षी आकर्षणाचा केंद्रबिंदू आहे. फ्लेमिंगो हा उंच, गुलाबी आणि खालच्या दिशेला वलयांकित चोच असलेला पक्षी आहे. त्याला लांब व मोहक पाय, मोठे पंख आणि लहान शेपटी असते. ऑक्टोबर नोव्हेंबर महिन्यांमध्ये हजारोंच्या संख्येने स्थलांतर करून ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्यात येणारे हे रोहित पक्षी सर्वांनाच भावतात. मधल्या काही काळात कांदळवन कक्षाने ठाणे खाडीच्या समृद्ध कांदळवन क्षेत्रातील पक्षी संवर्धनासाठी एक मोठा प्रकल्प हाती घेतला होता. त्याचबरोबर ठाणे खाडीला रामसर पाणथळ जागेचा दर्जा देण्यात आला. विशेष म्हणजे ही खाडी सर्वात मोठ्या रामसर स्थळांपैकी एक आहे, ज्याचा विस्तार ६,५०० हेक्टर असून, त्यात इकोसेन्सेटिव्ह झोनचाही समावेश आहे. तसेच हे महानगरामध्ये असलेले पहिले रामसर स्थळ आहे. हे महाराष्ट्रातील तिसरे तर भारतातील ७२वे रामसर दर्जा प्राप्त पाणथळ आहे. असे असले तरी त्याच वेळी दुसऱ्या बाजूला ठाण्याची उपखाडी अशी ओळख असलेली न्हावा शेवा खाडी काही काळाने नष्ट होते की काय अशी भीती निर्माण झाली आहे. दळणवळणाचे आणि व्यापाराचे मोठे केंद्र म्हणून न्हावा शेवा बंदर ख्यातकीर्त असले तरी निसर्गावर मात करीत या उपखाडीचे अस्तित्व नाहीसे करण्याचा प्रयत्न चुकीचा आहे. येथील खाडीवर भराव टाकून त्याचे मुख सध्या बंद करण्यात आल्याचे सांगण्यात येते. उपलब्ध माहितीनुसार या खाडीचे मुख हे १,५०० मीटर असताना आता भराव टाकण्यात आल्याने ते केवळ १०० मीटर असल्याचे समजते. अर्थात त्यामुळे जैवविविधता ही आणि त्याचबरोबर स्थानिक मासेमारी ही कायमची नाहीशी होऊ शकते. या बंदराचा विस्तार करण्याच्या नावाखाली हा भराव टाकण्यात आला असला तरी ते करताना निसर्गाचा विचार करणे आवश्यक होते. प्रगती व विकास हा जेवढा आवश्यक आहे तेवढेच निसर्गाचा समतोल कायम राखणेही महत्त्वाचे असल्याचा विसर अनेकदा पडत चालला आहे. गेल्या काही काळात ठाण्यासह मुंबई महानगरांच्या खाडीतील अनेक क्षेत्रे नैसर्गिकरीत्या लुप्त होऊन त्या ठिकाणी दलदलीचा आणि कांदळवन आच्छादित अधिवास निर्माण झाला आहे. परिणामी अरुंद झालेले खाडीक्षेत्र हे शहरी भागातील पूरपरिस्थितीला आणि सुपीक जमिनीच्या नष्टतेला कारणीभूत ठरले असून, येत्या काळामध्ये ही समस्या वाढणार असल्याचे एका अभ्यासाअंती समोर आले आहे. ठाणे जिल्ह्याला लांबच लांब असा खाडीकिनारा लाभला आहे. ठाणे खाडी, कोपरी, चेंदणी कोळीवाडा, महागिरी कोळीवाडा, विटावा कोळीवाडा, कळवा खाडी, जानकीनगर कळवा, दिघा, बाळकूम, घोडबंदर पट्ट्यातील या खाडीकिनारी खारफुटी विस्तीर्ण प्रमाणात आपणास आढळते. परंतु, भूमाफियांनी या खारफुटीची कत्तल करून येथे मोठ्या प्रमाणात चाळी बांधल्या आहेत. त्यामुळे निसर्गाचा ऱ्हास झाला आहे. गेल्या काही वर्षांपासून खारफुटीची सुरू असलेली बेसुमार कत्तल मानवी अतिक्रमणे आणि औद्योगिक प्रगती यामुळे ही जैवविविधता नष्ट होऊ लागली आहे. ठाणे हे औद्योगिक शहर म्हणून ओळखले जात असल्याने अनेक उद्योगांनी या भागात मोठा विस्तार केला होता. उद्योगांच्या रसायनमिश्रित पाण्याने ही खाडी प्रदूषित झाली आहे. त्यामुळे औद्योगिकीकरणाच्या विकासाबरोबरच निसर्गाच्या ऱ्हासाला सुरुवात झाली आहे. महापुरामुळे होणारा विध्वंसही खारफुटीच्या नाशामुळेच होतो. त्यामुळे खारफुटी वाचवणे हे महत्त्वाचे आहे. गेल्या काही काळात कळवा खाडीकिनारा परिसरात मोठ्या प्रमाणात झोपड्या उभ्या राहिल्या असून, यामुळे खाडीकिनारी भागातील खारफुटी नष्ट होऊ लागली आहे. कळवा ते साकेत भागात मोठ्या प्रमाणात झोपड्या बांधल्या जात आहेत. गायमुख, कोलशेत, बाळकूम परिसरात दिवसाढवळ्या तिवरांची कत्तल सुरू आहे. मोठ्या प्रमाणात भराव टाकून बांधकाम करण्यात आले असले तरी त्यावर काहीही कारवाई झालेली नाही. चेंदणी कोळीवाडा परिसरातही खारफुटी नष्ट करण्यात आली आहे. खाडीत मातीचा भराव टाकून खारफुटी नष्ट होत आहे. या बांधकामांमुळे खाडीचे मुख अरुंद होत चालले आहे. मात्र याकडे स्थानिक प्रशासन आणि लोकप्रतिनिधींकडून दुर्लक्ष केले जात असल्याची चर्चाही ऐकायला मिळते. खाऱ्या जमिनीमध्ये फुटणारी झाडे म्हणजे खारफुटी किंवा तिवरे असे म्हणता येईल. खार हा सापेक्ष शब्द आहे. पूर्ण खारे म्हणजे समुद्रातील आणि निमखारे म्हणजे खाडीतील. खारफुटी ही सहसा या दोन्हीमधल्या भागात जास्त असते. कांदळ किंवा कांदळवन म्हणूनही तिला ओळखतात. तिवरे आणि कांदळ असेही यात प्रकार आहेत, असे अभ्यासक सांगतात. बाळकूम, खारेगाव, विटावा, कशेळी, काल्हेर, केवणी दिवे, खारबाव आदी परिसरांत आगरी कोळी बांधवांची वस्ती आहे. पूर्वी त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात मासेमारीचा व्यवसाय केला जात होता. कांदळवनाच्या तळाशी मासे अंडी देतात. त्यामुळे जीवसृष्टी वाढते. पण आता कांदळवनाची कत्तल होत असल्याने मासे अंडी देत नाहीत. तसेच प्रदूषित पाण्यामुळे पूर्वी मिळणारे बोईत, चिमणी, चिंबोरी, जिताडी, पोची, कोळंबी, निवट, खरबी, काळा मासा, शिवरा, मांगीन, पिळशा, घोडी, मांदेली बागडे यांच्यासह अनेक मासे आता नामशेष झाले आहेत. आगरी- कोळी भूमिपुत्रांच्या मासेमारीचा व्यवसाय बंद पडला आहे. त्यामुळे खारफुटीचे जतन महत्त्वाचे आहे. ठाणे, मुंबई, नवी मुंबई, कल्याण, भिवंडी पट्ट्यात येत असलेल्या नवनवीन प्रकल्पांमुळे गेल्या काही काळात खारफुटीची प्रचंड हानी झाली आहे. ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील खाडी, समुद्रकिनाऱ्यामुळे खाडी क्षेत्र मोठे आहे. ठाणे जिल्ह्यातील खारफुटीचे मोठे क्षेत्र नाल्यातून, खाडीतून येणाऱ्या कचऱ्यामुळे बाधित होत आहे. या कचऱ्यामुळे खारफुटीला धोका निर्माण झाला आहे. राज्य सरकारने चालू वर्षात ठाणे जिल्ह्यात सुमारे तीन लाख खारफुटींचे रोपण करण्याचे लक्ष्य आखले आहे. मात्र आहे त्या खारफुटीचे क्षेत्र कमी होत असताना ही खारफुटी वाचवण्यासाठी प्रयत्न तोकडे पडत आहेत, ही वस्तुस्थिती आहे. ठाणे आणि कळवा खाडी परिसर प्रचंड कचऱ्याने व्यापला आहे. एकीकडे अनधिकृत बांधकामांमुळे खारफुटी उद्ध्वस्त होत असताना कचऱ्यामुळे खारफुटीसमोर संकट उभे राहिले आहे. ठाणे, मुंबई, नवी मुंबई, कल्याण, भिवंडी या पट्ट्यात निवडक ठिकाणी खारफुटी शिल्लक आहे. तर दुसरीकडे खाडी, नाल्यांतून वाहून आलेल्या आणि नागरिकांनी टाकलेल्या कचऱ्यामुळे खारफुटीचे क्षेत्र नष्ट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ठाणेसारख्या शहरांत दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत जात आहे. शहर म्हणजे येणाऱ्या लोकांसाठी लाइफलाइन असले तरी खारफुटी या शहरांना जगवणार आहे. खारफुटीची मुळे जमिनीत खूप खोलवर जातात. त्यामुळे जमिनीला आणि गाळाला धरून ठेवतात. हवेतील प्राणवायू घेतात. पूर, वादळ किंवा त्सुनामी आल्यास पाण्याचा लोंढा या वनस्पतीच्या मुळाशी झाडात तसेच पानांत अडतो, जेणेकरून वाढलेली पाण्याची पातळी वस्तीपर्यंत पोहोचत नाही. १९ वर्षांपूर्वी आलेला २००५चा महापूर हा खारफुटी नाशाचे उदाहरण आहे, हे विसरून अजिबात चालणार नाही. त्यामुळे भविष्यातील धोके टाळण्यासाठी खारफुटीचे जतन महत्त्वाचे आहे. आपण खाडीची काळजी घेतली तर ती आपली काळजी घेईल.

# खरा तो एकची धर्म..जगाला प्रेम अर्पावे..!!

**राजकीय** तसेच धार्मिक नेत्यांच्या चिथावणीखोर व्यक्तव्यांना थारा न देता आपल्या समंजसपणाचे दर्शन यंदाच्या गणेशोत्सवातही गणेशभक्त दाखवून देतील, सोबतच मुस्लीम धर्माचे अनुयायीही कुठल्याही धार्मिक आणि राजकीय वैमनस्य निर्माण करणाऱ्या वक्तव्यांना थारा देणार नाहीत, यासाठी दोन्हीकडील नेत्यांनी स्थानिक नेतृत्वांनी काळजी घ्यायला हवी. आपल्या धर्म आणि सामूहिक शक्तीचे प्रदर्शन करण्यासाठी उत्सवांना वेठीस धरता कामा नये. धर्म ही पूर्णपणे वैयक्तिक बाब आहे. धर्म मानवी मनाशी जोडलेली गोष्ट आहे. मनातल्या अविचारांना दूर सारण्याची बुद्धी गणपती बाप्पा देत असल्यानेच श्रीगणेशाला बुद्धीदाता म्हटले गेले आहे. दुसरीकडे आपल्या मनातील अविचारांना दूर करून सर्व मानवांसाठी प्रेम आणि करुणा निर्माण करण्याचा संदेश इस्लाममधून देण्यात आलेला आहे. परंतु धर्माचा वापर राजकारणासाठी करणाऱ्या नेत्यांपासून सावध राहाण्याची गरज आहे. नेते काहीही म्हणोत, समाजमाध्यमांवर कितीची आक्षेपार्ह वक्तव्ये माथेफिरूंनी केली तरी त्यांच्या कटाचा भाग न होण्याचा समंजसपणा महत्त्वाचा आहे. सुखकर्त्याला निरोप देताना ही जाणीव ठेवायला हवी. कुठल्याही मुद्द्याला धार्मिकतेच्या चष्म्यातून पाहणारे, राजकीय, सामाजिक शक्तीप्रदर्शन करून भीती, तणाव आणि दुसऱ्या गटांना नामोहरम करण्यासाठी वातावरणात तणाव ठेवणारे नेते, भूतकाळातल्या जुन्या कढीला वर्तमानात आणून ऊत देण्याचा प्रकार रोखायला हवा. त्यासाठी इतकेच करायला



हवे, कुठल्याही वादग्रस्त, तणाव निर्माण करणारे संदेश समाजमाध्यमांवर आल्यास ते पुढे व्हायरल करण्यापासून रोखायला हवेत. समाजमाध्यमातील समुहांनी या काळात विशेष लक्ष द्यायला हवे. आपल्या समुहात धार्मिक तेढ निर्माण करणारे संदेश व्हायरल होत असतील तर ते डिलिट करून पुढे फॉरवर्ड करण्यापासून थांबायला हवेत. त्यासाठी समुहांच्या प्रमुखांनी वेळीच समूह सदस्यांना सूचना द्यायला हवी. अफवांवर विश्वास ठेवल्याने गोंधळाचे वातावरण निर्माण होते. त्यातून हिंसक स्थिती निर्माण होऊ शकते, त्यामुळे अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच एखाद्या अप्रिय घटनेची जरी खरी माहिती मिळाली तरी अशी संवेदनशील माहिती प्रसारित करण्यापासून रोखायला हवी. ज्यामुळे सामाजिक वातावरण गढुळले जाईल. मुंबईसारख्या शहरात अनेक ठिकाणी श्री गणेशाच्यावाजतगाजत विसर्जन मिरवणुका निघतात. मुंबईतील बावला मस्जिद, भेंडीबाजार किंवा मुहम्मद अली रोड अशा मुस्लीमबहुल वस्त्यांमधूनही मानाचे गणपती विसर्जनासाठी जातात त्यावेळी या वस्त्यांमधूनही गणेशभक्तांसाठी सहकार्य आणि मदतीचे होणारे दर्शन मुंबईतील धार्मिक ऐक्याचे दर्शन घडवते. असेच सहकार्य ईदमधील मिरवणुकींच्या निमित्ताने मुंबईत लालबाग, परळ, जे.जे. मार्ग या भागात पाहायला मिळते. मुंबईची ही सर्वव्यापी ओळख जगात त्यामुळंच आहे. एकमेकांशी असलेल्या सहकार्यावरच आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईचा गाडा वर्षानुवर्षे हाकला गेला आहे. मुंबई शहर आणि महाराष्ट्र राज्य जगाला आदर्शस्थानी राहिलेले आहे.ज्येष्ठ कवी, लेखक राहत इंदौरी साहेबांचा शेर महत्त्वाचा आहे.'सरहदोंपर तनाव है क्या, कुछ पता तो करो चुनाव है क्या...!! या सरहदीवरचा तणाव निवडणुकीच्या निमित्ताने आपल्या शहरात गावपाड्यात आणि वस्त्यांमध्ये आणण्याचे होणारे प्रयत्न येथील सर्वधर्मीय नागरिकांनी हाणून पाडायला हवेत. आपल्या संस्कृती सण-उत्सव आणि धर्मग्रंथांचे पावित्र्य जपताना संविधान या राष्ट्रीय

ग्रंथाने आपला धार्मिक स्वातंत्र्याचा दिलेला अधिकार मोलाचा आहे.या अधिकारासोबतच नागरिकांना कर्तव्ये आणि मार्गदर्शक तत्वेही घालून दिलेली आहेत. आपल्या धार्मिक स्वातंत्र्याच्या अधिकाराचे इतर नागरिकांसाठी अतिक्रमण ठरता कामा नये, एवढी काळजी जरी घेतली तरी गणेशोत्सव आणि ईद सण-उत्सवांचा आनंद द्विगुणीत होईल. विविध धर्मातील सण-उत्सवातून लोकांनी एकत्र

येऊन विधायक कार्यासाठी आपले योगदान द्यावे हा यामागील उद्देश आहे. सण-उत्सवातून समाज समुदायात प्रेम, मैत्री, करुणा वृद्धिंगत व्हायला हवी. त्यामुळेच धार्मिक उन्मादाचे वातावरण निर्माण करून आपली राजकीय पोळी भाजणाऱ्या घटकांना बाजूला ठेवून आपल्या बुद्धी आणि सद्सद्विवेकाचा वापर नागरिकांनी करायला हवा, 'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे' ही सानेगुरुजींचीशिकवण या निमित्ताने अमलात यायला हवी. सामाजिक उन्मादाचे विघ्न दूर व्हायला हवे....!!

**श्री. शिवाजी विठ्ठल चौगुले,**
**कल्याण (पूर्व)-ठाणे**

# क्रिकेटच्या नव्या हंगामाची सुरुवात विजयाने करा!

**आजपासून** म्हणजे १९ सप्टेंबर पासून भारतीय क्रिकेटचा नवा हंगाम सुरू होत आहे. या हंगामाची सुरुवात बांगलादेश सोबत आजपासून सुरू होणाऱ्या कसोटीपासून होत आहे. आजपासून चेन्नई येथील चेपॉक मैदानावर भारत आणि बांगलादेश यांच्यात पहिली कसोटी लढत रंगणार आहे. बांगलादेशचा संघ भारतात दोन कसोटी आणि तीन टी २० सामने खेळणार आहे. या मालिकेकडे केवळ भारताचेच नाही तर क्रिकेट विश्वाचे लक्ष लागले आहे. वास्तविक बांगलादेश याआधी ज्या ज्या वेळी भारत दौऱ्यावर आला त्या त्या वेळी प्रसार माध्यमांनी आणि जागतिक क्रिकेटने त्याची म्हणावी दखल घेतली नाही त्याला कारणही तसेच होते कारण भारत आणि बांगलादेश या दोन्ही देशात भारतच नेहमी वरचढ राहिला आहे. बांगलादेशने भारता विरुद्ध आजवर एकही कसोटी जिंकली नाही त्यामुळे बांगलादेश संघाला ना भारतीय प्रेक्षक जमेस धरत होते ना प्रसार माध्यमे मग यावेळेसच प्रसार माध्यमांचे आणि क्रिकेटप्रेमिंचे या दौऱ्याकडे लक्ष का ? तर त्याचे उत्तर शोधण्यासाठी आपल्याला काही दिवस मागे जावे लागेल. काही दिवसांपूर्वी बांगलादेशचा संघ पाकिस्तान दौऱ्यावर गेला होता. या दौऱ्याकडे देखील प्रसार माध्यमांनी दुर्लक्षच केले होते कारण सर्वांना वाटले होते की पाकिस्तान बांगलादेशला सहज नमवेल कारण पाकिस्तान संघ हा बांगलादेश



पेक्षा बलवान संघ होता मात्र प्रत्यक्ष घडले उलटेच. पाकिस्तानने बांगलादेशची शिकार करण्याऐवजी बांगलादेशनेच पाकिस्तानची शिकार केली. बांगलादेशने पाकिस्तानला सलग दोन कसोटीत नमवून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. बांगलादेश अशी ऐतिहासिक कामगिरी करेल अशी अपेक्षा कोणालाच नव्हती मात्र त्यांनी ती कामगिरी केली. पाकिस्तानला नमवणाऱ्या बांगलादेश संघात जे खेळाडू होते तेच खेळाडू भारत दौऱ्यावर आले आहेत म्हणूनच या संघाने पाकिस्तानात जी कामगिरी केली त्याची पुनरावृत्ती ते भारतात करतील का ? हे पाहण्यासाठी संपूर्ण क्रिकेट विश्वाचे लक्ष या मालिकेकडे लागले आहे. पाकिस्तानला पाकिस्तानात जाऊन पाणी पाजल्यावर बांगलादेश संघाचे मनोबल ही खूप वाढले आहे. बांगलादेशच्या कर्णधाराने थेट भारताला पराभूत करण्याची भाषा केली आहे अर्थात बांगलादेशने कितीही फुशारक्या मारल्या तरी बांगलादेश भारताला पराभूत करू शकत नाही कारण भारत म्हणजे पाकिस्तान नाही. भारताचा संघ हा क्रिकेट विश्वातील सर्वात बलवान संघ आहे. भारताची फलंदाजी जगातील सर्वात बलवान फलंदाजी आहे तर गोलंदाजी जगातील सर्वात घातक गोलंदाजी आहे. रोहित शर्मा, यशस्वी जयस्वाल, शुभमन गील, विराट कोहली, के एल राहुल, ऋषभ पंत ही फलंदाजांची लाईन अप पाहिली तरी धडकी भरते. जगातील सध्याचा सर्वात घातक वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमरा आणि मोहंमद सिराज ही वेगवान जोडगोळी भारताला सुरुवातीलाच बळी मिळवून देतात तर आश्विन, जडेजा आणि अक्षर पटेल ही फिरकी तिकडी प्रतिस्पर्धी संघाला लोटांगण घालायला लावण्यास पुरेशी आहे शिवाय कुलदीप यादव हा देखील आपल्याकडे आहे त्यामुळे भारत ही मालिका २ - ० ने सहज जिंकेल आणि ती तशी जिंकायलाही हवी कारण ही मालिका भारताला विश्व टेस्ट चॅम्पियनशिपच्या ( WTC ) फायनल मध्ये पोहचवण्यासाठी खूप महत्वाची आहे. भारताने जर बांगलादेशला क्लीन स्वीप दिला तर भारताचे पॉइंट वाढतील त्याचा भारताला मोठा फायदा होईल. शिवाय भारताला विजयाची लय सापडेल कारण या मालिके नंतर भारताला इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यासारख्या तगड्या संघाविरुद्ध खेळायचे आहे. जर भारताला विजयी लय सापडली तर त्याचा फायदा इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया संघाविरुद्ध होऊ शकतो. म्हणूनच भारतासाठी ही महत्वाची मालिका आहे. भारतीय खेळाडूंना देखील हे चांगले माहीत आहे म्हणूनच भारतीय संघातील खेळाडू ही मालिका २ - ० ने जिंकण्यासाठी जीवाचे रान करतील यात शंका नाही. क्रिकेटच्या नव्या हंगामाची सुरुवात विजयाने करण्यासाठी भारतीय संघाला मनापासून शुभेच्छा!

**- श्याम ठाणेदार, पुणे**

## पत्र मानस

### महायुतीचे नकली बुरखे!

महाराष्ट्रात लवकरच विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे आपली वोटबँक शाबूत ठेवण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. त्याचबरोबर पक्षांतराला ऊत आला आहे. एकापक्षातून दुसऱ्या पक्षात जाण्यासाठी जोरदार फिल्डिंग लावली जात आहे. लोकसभेसारखाच विधानसभेत पुन्हा एकदा कटु अनुभव येऊ नये यासाठी महायुतीकडून अनेक कारनामे केले जात आहेत. मग कुणी महिलांना बुरखे वाटत फिरत आहेत तर कुणी मुस्लिम मतदारांना आकर्षित करण्यासाठी अजमेर शरीफचे दर्शन घडवताना दिसत आहेत. एरवी मुस्लिमांना विरोध करणारे आणि स्वत:ला हिंदुत्वाचे तारणहार समजणारे एकगठ्ठा मतांच्या लाचारीसाठी स्वपक्षाचा अजेंडा पायदळी तुडवत आहेत. मशिदीवरील भोंग्यांना विरोध करणाऱ्या मनसेची मुस्लीम विरोधी भूमिका आता मवाळ झाली आहे का अशी चर्चा सुरू झाली आहे. त्याला कारण आहे की, मनसेचे नेते दिलीप धोत्रे यांनी पंढरपुरातील एक हजार मुस्लीम बांधवांना अजमेर दर्शन घडवलं आहे. विधानसभेच्या तोंडावर राज्यातील पहिलाच प्रयोग या माध्यमातून मनसेने केला आहे. याचा जाब राज ठाकरे आपल्या जाहीर झालेल्या उमेदवारांना विचारणार की मुस्लिम मते मिळविण्यासाठी हिंदुत्वाला तिलांजली देणार याचे उत्तर राज ठाकरे यांना द्यावेच लागणार.

भाजपबरोबर सरकार स्थापन केल्याने महायुतीतील घटक पक्ष शिवसेना व राष्ट्रवादीच्या अजित पवार गटापासून मुस्लीम समाज दुरावला असल्याचे चित्र आहे. एकगठ्ठा मतपेटी असलेल्या या समाजाला विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आकर्षित करण्याचा प्रयत्न शिवसेना (शिंदे गट) करत असल्याचे दिसून येत आहे. भायखळा मतदारसंघाच्या शिंदे गटाच्या आमदार यामिनी जाधव यांनी मुस्लीम महिलांसाठी बुरखा वाटप कार्यक्रमाचे आयोजन केले होते. शिंदे गटाला आता मुस्लीम समाजाची गरज वाटू लागली असल्याचे हे चिन्ह आहे. हिंदुत्ववादी पक्ष म्हणून ओळख निर्माण करणाऱ्या आणि प्रसार माध्यमांसमोर हिंदुत्वाच्या फुशारक्या मारणाऱ्या महायुतीमधील शिवसेना गटाचे ढोंग उघडे पडले आहे. महायुतीमधील एका शिंदे गटामुळे संपूर्ण महायुतीच बदनाम होत आहे. हिंदुत्व सोडून काँग्रेस सोबत गेलेल्या शिवसेना (उबाठा) बाबत मुस्लिम समाजाला खात्री झाल्याने त्यांनी लोकसभा निवडणुकीत फतवे काढून उबाठा उमेदवारांना एकगठ्ठा मतदान केले. मुस्लिम मतांमुळेच उबाठाचे उमेदवार निवडून आले, अशी टिका महायुतीच्या नेत्यांकडून त्यावेळी होत होती. मग आता बुरखे वाटप करताना हिंदुत्व कुठे गेले याचे आत्मपरिक्षण संबंधितांनी करावे. लोकसभेत झालेला पराभव शिंदे गटाला जिव्हारी लागल्यानेच मुस्लिम मते मिळवण्यासाठी बुरखे वाटले जात आहेत. ठराविक समाजाचे लांगुलचालन केले जात आहे. कितीही बुरखे वाटले आणि एखाद्या ठराविक समाजाचे लांगुलचालन केले तरी आगामी विधानसभा निवडणुकीत जनता महायुतीचा नकली बुरखा टराटर फाडल्याशिवाय राहणार नाही.

**- दत्ता श्रावण खंदारे, धारावी**

### योग्य परराष्ट्रनीतीचा परिणाम !

सर्वार्थाने वैशिष्ट्यपूर्ण असलेल्या राज्यघटनेत भारतीय संस्कृतीचे सार सामावलेले आहे. सामाजिक न्यायाचे तत्व संविधानात अंतर्भूत असल्याने राज्यघटनेचा गाभा सत्ताधाऱ्यांनीच समजून घेणे गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान मोठे असल्याचे फक्त म्हटले जाते. परंतु वास्तवात तसे नसल्याचे प्रकर्षाने दिसते. विद्यमान सत्ताधारी आरक्षण, हा भारतीय राज्यघटनेचा आत्मा असल्याचे मान्य करतात. परंतु प्रत्यक्षात मात्र आरक्षणाला विरोध करतात, हे विसंगत वाटते. लोकशाहीचा अभिमान बाळगत विविधतेत एकता असल्याचा साक्षात्कार झाला, हे ऐकून बरे वाटले. गेल्या दहा वर्षात या सर्वांचा विसर पडून सत्तेच्या नशेत हुकूमशाहीकडे होणारी देशाची वाटचाल, आता काहीशी मागे पडेल अशी आशा वाटते. दुर्दैवाने आज देशात सत्ताधारी संविधानाला अपेक्षित राज्यकारभार करीत नसून लोकशाहीचाच गळा घोटताना दिसतात. अनेकदा त्यांची घटनाबाह्य कृती प्रकर्षाने दिसून आली आहे. तेव्हा मात्र संविधानाचा विसर पडतो. शालेय पुस्तकातून नागरिकशास्त्राला वगळण्याचे धोरण मात्र पटत नाही. एकीकडे राज्यघटनेचे गुणगान गायचे व दुसरीकडे त्याच्याविरुद्ध कारभार करायचा हे योग्य नाही. परिणामी सत्ताधाऱ्यांनी स्वायत्त यंत्रणांचा गैरवापर करून लोकशाही तत्त्वांना तिलांजली देत लोकशाही व स्वातंत्र्याचा गळा आवळला आहे. सत्तेच्या जोरावर केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर करून विरोधकांना खोट्या गुन्ह्यात अडकवून, तुरुंगात डांबणे आता सर्वोच्च न्यायालयाने चपराक देताच सरकारच्या अंगाशी आली आहे. न्याय मिळविण्यासाठी महिनोनमहिने तुरुंगात खितपत पडणे हे मानवी हक्क व स्वातंत्र्याची पायमल्लीच आहे. राज्यपालांची मनमानी सुरू असणे हेही लोकशाहीला धरून नाही. त्यावर कोणीच काही बोलत नाही. त्यामुळेच पिंजऱ्यातील पोपटांचे आयतेच फवले आहे. मग राज्यघटनेचे उदात्तीकरण करून कोणता हेतू साध्य होणार ? की जनतेत दाखवण्यापुरते लोकशाही दिन, संविधान दिन साजरे करायचे ? यातून भावी पिढीला कोणती प्रेरणा मिळेल ? अर्थात जेव्हा सत्ताधारी पक्ष प्रामाणिकपणे लोकशाही प्रणाली व संविधान अमलात आणतील, तेव्हाच खऱ्या अर्थाने संविधान मंदिरे प्रेरणादायी ठरतील असे वाटते.

**- पांडुरंग भाबल,भांडुप.**

### सणासुदीच्या काळात नेमकी करवाढ करण्याची कारणे काय ?

आगामी दोन तीन महीने नवरात्र, दसरा, दिवाळी अशा सणासुदीचा काळ आहे. नेमकी सरकारने क्रूड, रिफाइंड सूर्यफूल, सोयाबीन तेल कच्चे आणि शुद्ध पाम तेल व ईतर काही खाद्यतेलांवरील कस्टम्स ड्युटीत वाढ जाहीर केली आहे. कच्चे पाम तेल, कच्चे सूर्यफूल बियाणे आणि कच्चे सोयाबीन तेल यांवर पूर्वी शून्य असणारी कस्टम्स ड्युटी आता २० टक्के दराने आकारली जाणार आहे. शुद्ध सूर्यफूल बियाणे तेल, शुद्ध पाम तेल आणि रिफाइंड सोयाबीन तेलावरील कस्टम्स ड्युटी आता ३२.५० टक्के शुल्क दराने आकारली जाणार आहे जी यापूर्वी १२.५ टक्के शुल्कदराने आकारली जात होती. परिणामी कच्च्या तेलांवरील प्रभावी शुल्कदर ५.५ टक्क्यांवरून २७.५ टक्क्यांवर पोहोचले आहे. रिफाईंड तेलांसाठी ही वाढ १३.७५ टक्क्यांवरून ३५.७५ टक्क्यांवर पोहोचली आहे. ■

## अनैतिक संबंधातून पुण्यात हत्या; दोघे संशयित आरोपी कल्याणमधून ताब्यात

**कल्याण :** : पुणे- हिंजवडी येथे पत्नीसोबत अनैतिक संबंध असल्याच्या संशयातून एका तरुणाची हत्या करण्यात आल्याची घटना घडली होती. हिंजवडी पोलिसांनी या फरार दोन आरोपींचा शोध सुरू केला असता बिहारला पळून जाण्याच्या तयारीला असलेल्या दोघांना कल्याण रेल्वे स्टेशनवरून ताब्यात घेण्यात आले आहे. पिंपरी चिंचवडहिंजवडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका नर्सरीमध्ये काम करणारया प्रवीण महतो याची धारदार हत्याराने गळा चिरून हत्या करण्यात आल्याची घडली होती. राजकुमार याला आपल्या पत्नीशी प्रवीणचे अनैतिक संबंध असल्याचा संशय होता. या संशयावरुन राजू कुमार हा पुणे येथे राहणारा त्याचा मित्र धीरजकुमार याला भेटला. धीरज हा काही महिन्यापूर्वी प्रवीण सोबत नर्सरीत काम करीत होता. धीरज याने राजूकुमार याला बिहारहून बोलावून घेत दोघांनी मिळून प्रवीणची हत्या केल्याचे समोर (Crime News) आले आहे. यानंतर पुणे येथील वाडक विभागाचे सहाय्यक पोलिस आयुक्त सुनिल कुराडे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा तपास सुरु होता.



# आमच्याच मुख्यमंत्र्यांच्या हस्ते चीपचे अनावरण होईल : फडणवीस

## नवी मुंबईत सेमीकंडक्टर चीप प्रकल्पाचे उदघाटन




प्रतिनिधी
■ नवी मुंबई

भारतरत्न सचिन तेंडुलकर यांना क्रिकेटचे देव म्हटले जाते. शोएब अख्तर असू दे नाहीतर कोणताही वेगवान गोलंदाज असू द्या, त्यांनी प्रत्येक गोलंदाजाला चौकार, षटकार मारलेले आहेत. पण ते पिचवरून 'चीप'वर कधी आले कळलेच नाही, अशी टोलेबाजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी मुंबई येथे सेमीकंडक्टर चीप प्रकल्पाच्या उदघाटनप्रसंगी केली.

मराठी माणूस युनिक, अद्ययावत आणि वेगळ्या क्षेत्रात क्रांती घडविण्याचे काम करत आहे. यामुळेच राज्य सरकार आरआरपी इलेक्ट्रॉनिक्स कंपनीच्या पाठीशी आहे. बांधकाम प्रकल्प राज्यासाठी गेमचेंजर ठरत आहेत. त्याचप्रमाणे सेमीकंडक्टर प्रकल्प देशासाठी महत्वाचा ठरणार आहे, असेही मुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले.

नवी मुंबई येथे आरआरपी इलेक्ट्रॉनिक्स कंपनीच्या सेमीकंडक्टर प्रकल्पाचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते बुधवारी झाले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री उदय सामंत, ज्येष्ठ अणु शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर, क्रिकेटपटू सचिन तेंडूलकर यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

सेमीकंडक्टर प्रकल्पातील चीप समर्पितचा कार्यक्रम २०२६ मध्ये होणार आहे. तेव्हा आमच्याच मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात आम्ही सत्तेत असणार आहोत, यात आमच्या मनात शंका नाही. परंतु तुमच्या मनात शंका असो किंवा नसो. तेव्हाच्या कार्यक्रमाची आगाऊ नोंदणी आताच करून ठेवा, असे विधान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

देवेंद्र फडणवीस यांची ही प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांना प्रत्युत्तरा दाखल होती. रोहित पवार यांनी आज सकाळी माध्यमांशी बोलताना म्हटले, "हा प्रकल्प महायुती सुरू करत असली तरी निश्चितपणे राज्यातील महाविकास आघाडीचे पुढील सरकार हा प्रकल्प पूर्ण करेल."

**मविआ सरकारमुळे उद्योग राज्याबाहेर गेले**

*"विरोधकांकडून सातत्याने उद्योग पळाले, अशी टीका केली जाते. पण एका महिन्यात किंवा वर्षात उद्योग येत नाही. कोणत्याही उद्योगाला आणण्यासाठी खूप तयारी करावी लागते. जे उद्योग गेले, त्यांना महाराष्ट्रात कामच करायचे नव्हते. कारण राज्य सरकारकडून त्यांना जे सहकार्य मिळायला हवे होते, ते मिळाले नाही", असा आरोप एकनाथ शिंदे यांनी केला. आमचे सरकार आल्यानंतर आता अनेक उद्योग राज्यात येत आहेत. महाराष्ट्र आता उद्योग मित्र राज्य झाले आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.*

# आईवरून शिवी दिल्याने सुपरवायझरची केली हत्या

## लिफ्टमनने सुपरवायझरला संपवले



प्रतिनिधी
■ ठाणे

ठाण्यात एका लिफ्टमनने आपल्या सुपरवायझरची निर्घृणपणे हत्या केल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे आरोपीने हत्या करण्याआधी एका क्राईम सीरिजची मदत घेतली. त्याने हत्या कशी करावी यासाठी काही क्राईम सीरिज पाहिल्या. यानंतर त्याने हत्या केली. त्याचं गुन्हेगारी कृत्य उघड झाल्यानंतर पोलीसही चक्रावले आहेत.

ठाण्यात दोन दिवसांपूर्वी एका उच्चभ्रू सोसायटीच्या छतावर शीर छाटलेला एक मृतदेह आढळला होता. ही घटना समोर येताच ठाण्यात एकच खळबळ उडाली होती. ज्या कृतीने हत्या करण्यात आली होती हे पाहून पोलीस देखील आवक झाले. ठाण्यातील कापूरबावडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत हा गुन्हा घडला. गुन्ह्याची तीव्रता पाहता पोलिसांनी तात्काळ तपास सुरू केला. या घटनेतील मृतक व्यक्तीचं नाव सोमनाथ सादगीर (वय-३५ वर्षे) असा असून तो या उच्चभ्रू सोसायटीचा सुपरवायझर असल्याचं समोर आलं आहे. पोलिसांनी सोमनाथ सादगिरी याचा मोबाईल तपासला असता त्याच्यावर काही संशयास्पद गोष्टी पोलिसांना लक्षात आल्या. यावरून त्याच्याच हाताखाली कामाला असलेला लिफ्टमन प्रसाद कदम याने सोमनाथ सदगीर याची हत्या केल्याचे तपासात समोर आले. पोलिसांनी घटनेनंतर अवघ्या दोन दिवसांत आरोपी प्रसाद कदम याच्या मुसक्या आवळल्या आहेत. पोलिसांनी प्रसादची चौकशी केली असता चौकशीतून धक्कादायक माहिती समोर आली.

सुपरवायझर सोमनाथ याने कामावर असताना प्रसाद कदम याला आईवरून शिवी दिली होती आणि याचाच राग प्रसादच्या मनात होता. तर सोमनाथ यांच्याकडून प्रसादने 8 हजार रुपये देखील उधार घेतले होते आणि हे पैसे मागताना सोमनाथ याने प्रसादला आईवरून शिवी दिली होती. हा संताप प्रसादच्या डोक्यात असल्याने त्याने सोमनाथचा काटा काढण्याचे ठरवले. यासाठी त्याने सोशल मीडियावर जाऊन अनेक क्राईम सीरिज पाहिल्या. हत्या कशा रितीने केली जाते, हत्या केल्यानंतर कसं पळून जातात, हत्यार कुठे लपवता येतात? या सगळया गोष्टींकरता प्रसादने वेब सीरिज पाहिल्या होत्या. त्यानंतर त्याने ठरवून सोमनाथला टेरेसवर नेलं तिथे त्याने आणलेल्या हत्याराने सोमनाथवर वार करायला सुरुवात केली. सोमनाथ जमिनीवर कोसळताच प्रसादने त्याच्या गळयावर हत्यार फिरून त्याचं शीर छाटलं आणि घटनास्थळावरून फरार झाला.

# भिवंडीत विसर्जन मिरवणूकी दरम्यान दगडफेक; तणावाचे वातावरण

प्रतिनिधी
■ भिवंडी

अनंत चतुर्दशी निमित्ताने गणेश विसर्जन मिरवणूकीत रात्री दगडफेक झाल्याने तणाव निर्माण झाला होता. यावेळी काही वाहनांची तोडफोड करण्यात आली. पोलिसांनी रात्री उशीरा जमाववर लाठीमार केला. काही पोलीस कर्मचारी देखील जखमी झाले आहेत. आज, बुधवारी कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला आहे. गेल्याकाही दिवसांपासून भिवंडीचे वातावरण दुषित करण्याचे कार्य समाजकंटकांडून सुरू झाले आहे असे रहिवाशांचे म्हणणे आहे.

भिवंडी येथून रात्री १२.३० वाजाता एका मंडळाची गणेश विसर्जन मिरवणूक सुरू होती. मिरवणूक वंजारपट्टी नाका परिसरात आली असता, अचानक दगडफेक झाली. या घटनेनंतर या भागात मोठ्याप्रमाणात गर्दी झाली. घटनेच्या निषेधार्थ घोषणाबाजी सुरू झाली. काहीवेळानंतर मोठ्याप्रमाणात जमाव याठिकाणी निर्माण झाला. तसेच काही वाहनांची तोडफोडही झाली. अखेर जमावाला पांगविण्यासाठी पोलिसांना लाठीमार करावा लागला. काही पोलीस देखील जखमी झाले आहेत. जमावातील काहीजणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला जात आहे. आज ठाणे पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त शहरात ठेवला आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेऊ नये असे आवाहन ठाणे पोलिसांनी केले आहे. मागील काही दिवसांपासून भिवंडीत काही समाजकंटकांकडून भिवंडीतील सामाजिक वातावरण बिघडविण्याचे कार्य सुरू असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

# भरधाव स्कूलबसची जोरदार धडक, तिघेजण जागीच ठार

## पाली खोपोली मार्गावर झाला अपघात




प्रतिनिधी
■ खोपोली

रायगड जिल्ह्यात एक भीषण अपघात झाल्याची बातमी समोर आली आहे. या अपघातात तीन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. रायगडच्या पाली खोपोली मार्गावर हा अपघात झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, परळीजवळ कानसळ गावाजवळ स्कूलबसने बाईकला समोरून धडक दिली. या बाईकवर तीन जण प्रवास करत होते.

बसने धडक देताच हे तिघेजण गाडीवरून फेकले गेले आणि गंभीर दुखापत होऊन तिघांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातानंतर स्थानिकांनी याची माहिती पोलिसांना दिली. माहिती मिळताच पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. अद्याप मृतदेहांची ओळख पटलेली नाही. तिघांचे मृतदेह जांभूळपाडा प्राथमिक केंद्रात आणण्यात आले असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

या घटनेचा एक व्हिडिओही समोर आला आहे. या व्हिडिओत दिसत आहे की, रायगडच्या पाली खोपोली मार्गावर बस जात असताना समोरून अचानक एक बाईक येते. या बाईकला बस जोरदार धडक देताना या व्हिडिओत दिसत आहे. या बाईकवर तीनजण प्रवास करत होते. बसच्या मागून येणाऱ्या एका वाहनचालकाने ही संपूर्ण घटना आपल्या मोबाईलच्या कॅमेरात कैद केली आहे.

**बसची स्टेरिंग रोड तुटल्याने बस थेट खड्ड्यात**

दरम्यान, धाराशिव तालुक्यातही एक भीषण अपघात झाल्याची बातमी समोर अली आहे. येथे बसची स्टेरिंग तुटल्याने बस रोडलगतच्या खड्ड्यात जाऊन अपघात झाल्याची घटना तालुक्यातील सारोळा गावाजवळ घडली आहे. सुदैवाने यामध्ये कोणतीही जिवितहानी झालेली नाही. सर्व प्रवासी सुखरूप आहेत.

कोंड गावाकडून धाराशिवकडे जाणारी बस क्रमांक एमएच ११ बीएल ९३५८ या गाडीचा स्टेरिंग तुटल्याने ही घटना घडली. तर या बसमध्ये ३८ प्रवाशी असल्याची माहिती समोर आली असून सर्जन सुखरूप आहेत.

# नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे अनंत चतुर्दशीदिनी 8435 श्रीमूर्तींना भावपूर्ण निरोप



प्रतिनिधी
■ नवी मुंबई

नवी मुंबई महानगरपालिकेने सर्व विसर्जनस्थळी केलेल्या सुयोग्य व्यवस्थेमध्ये अनंतचतुर्दशीदिनी मोठ्या प्रमाणात होणारा श्रीगणेशमूर्ती विसर्जन सोहळा निर्विघ्नपणे पार पडला. 22 नैसर्गिक व 137 कृत्रिम विसर्जनस्थळी उत्सवाच्या दहाव्या दिवशी 7846 घरगुती व 589 सार्वजनिक अशाप्रकारे एकूण 8435 श्रीगणेशमूर्तींचे भावपूर्ण विसर्जन करण्यात आले. त्यामध्ये 896 शाडूच्या श्रीमूर्तींचा समावेश होता.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे बनविण्यात आलेल्या मोठ्या व्यासपीठावरून विसर्जनस्थळाकडे प्रस्थान करणा-या श्रीगणेशमूर्तींवर पुष्पवृष्टी करीत श्रीगणेशाला भावपूर्ण निरोप दिला तसेच श्रीगणेशभक्तांचे स्वागत केले. याप्रसंगी आयुक्तांसमवेत अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार तसेच अति. आयुक्त तथा शहर अभियंता शिरीष आरदवाड, प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार, परिमंडळ 1 चे उपआयुक्त सोमनाथ पोटरे व इतर विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते. यावेळी माजी खासदार संजीव नाईक व अनेक माजी नगरसेवक यांनी व्यासपीठास भेट दिली.

महानगरपालिकेच्या वतीने सर्वच विसर्जन स्थळांवर चोख व्यवस्था ठेवण्यात आली होती. आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी दुपारपासूनच मोठ्या संख्येने मूर्ती विसर्जन होते अशा कोपरखैरणे धारण तलावावरील नवीन यांत्रिकी तराफा तसेच क्रेन सुविधेची पाहणी केली तसेच इतर विविध ठिकाणच्या विसर्जन स्थळांना भेटी देत व्यवस्थेची पाहणी केली होती व मौलिक सूचना केल्या. या सूचनांची त्वरित अंमलबजावणी करण्यात आली. अनंत चतुर्दशीदिनी सार्वजनिक श्रीगणेशोत्सवांच्या आकाराने मोठ्या मूर्तींचे विसर्जन होणार असल्याने सर्व विसर्जन स्थळांवर अधिक सक्षम व्यवस्था ठेवण्यात आली होती.

## आज शिवसेना उबाठाचे उपशहरप्रमुख (डोंबिवली पश्चिम) तानाजी मालुसरे यांची शोकसभा

■ डोंबिवली

डोंबिवली पश्चिम विभाग उबाठाचे उपशहर प्रमुख आणि ज्येष्ठ शिवसैनिक तानाजी विठोबा मालुसरे यांचे नुकतेच हृदयाविकाराने दुःखद निधन झाले असून पश्चिम विभागातील नागरिकांच्या वतीने त्यांची शोकसभा आज गुरुवार १९ सप्टेंबर २०२४ रोजी सायंकाळी ७ वा शिवसेना संपर्क कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे, कुलाबा फोर्ट येथे १९७५ पासून ते शिवसेना प्रमुख मा. बाळासाहेब ठाकरे यांना दैवत मानून कट्टर शिवसैनिक म्हणून आणि माजी शाखाप्रमुख स्व. चंद्रकांत पवार, स्व. दारपशहा घडीयाळी, माजी नगरसेवक ज्ञा.भी. गावडे यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत होते. गेली चार दशके ते फोर्टमध्ये भव्य स्वरूपात शिवजयंती उत्सवाचे आयोजनही करीत असत. त्यांचे उत्तरकार्य २५ सप्टेंबर रोजी त्यांच्या जन्मगावी पोलादपूर तालुक्यातील साखर येथे होणार आहे.

# 'स्वच्छ भारत मिशन' उपक्रमात सहभागी होऊन परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रयत्न करूया - मंत्री रविंद्र चव्हाण



प्रतिनिधी
■ डोंबिवली

स्वच्छ भारत मिशन या उपक्रमामध्ये हिरीहिरीने सहभाग घेऊन आपले शहर , आपला परिसर स्वच्छ करण्यासाठी तुम्ही, आम्ही सर्वांनी एकत्रपणे प्रयत्न करूया असे प्रतिपादन मा.मंत्री रविंद्र चव्हाण यांनी आज केले. शासनाच्या निर्देशानुसार महापालिका क्षेत्रात स्वच्छता पंधरवडा दि.१८ नोव्हेंबर २०२४ ते ०२ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने या स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ डोंबिवली(प.) येथील कुंभारखाण पाडा येथील खाडी परिसरात करण्यात आला त्यावेळी बोलतांना त्यांनी हे प्रतिपादन केले, या वेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड , माजी पालिका सदस्य विकास म्हात्रे, उपायुक्त अतुल पाटील, विजयकुमार द्वासे तसेच इतर अधिकारी/कर्मचारी वर्ग,NSS चे विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते. यावेळी सर्व उपस्थितांच्या वतीने स्वच्छतेची शपथ घेण्यात येवून स्वच्छतेबाबत पथनाट्याचे सादरीकरणही करण्यात आले.

पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारत मिशनच्या माध्यमातून संपूर्ण देशभरामध्ये एक जनजागृतीचा उपक्रम २०१४ पासून सुरू केला आहे आणि त्याच उपक्रमाचा भाग म्हणून हे स्वच्छता अभियान सर्वत्र राबविले जात आहे. या वर्षी अनंत चतुर्दशीनंतर संपूर्ण शहरातील गणेशघाट तसेच परीसरातील संपूर्ण स्वच्छता व्हावी, म्हणून कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने आजपासून हे स्वच्छता अभियान राबविण्याचे ठरविले आहे असे सांगत मा.मंत्री रविंद्र चव्हाण यांनी या अभियानाबाबत महानगरपालिकेच्या सर्व अधिकारी वर्ग, कर्मचारी त्याचप्रमाणे स्वच्छता दूत यांस धन्यवाद दिले. यावेळी मा.मंत्री रविंद्र चव्हाण, महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ इतर अधिकारी वर्ग तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी यांच्यमार्फत कुंभारखानपाडा गणेशघाट परिसरात साफसफाई मोहिम राबविण्यात आली आणि स्वच्छता अभियानतंर्गत "एक पेड माँ के नाम" या उपक्रमांत देशी प्रजातीच्या झाडाची लागवड मा.मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आली. कल्याण मधील या अभियानाचा प्रारंभ आज कल्याण (पश्चिम) येथील दुर्गाडी गणेश घाट येथे महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वच्छतेची शपथ घेवून झाला. "या स्वच्छता अभियानाच्या अनुषंगाने आपण सर्व गणेश घाटांवर साफसफाईची मोहिम सुरु केली आहे, स्वच्छतेबाबत लोकांमध्ये अधिकाधिक जनजागृती व्हावी यासाठी स्वच्छता ही सेवा या उपक्रमात, या पंधरवडयात महापालिकेने अनेक उपक्रमांचे आयोजन केले आहे, आज उपस्थित असलेल्या एनएसएसच्या, शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्यामार्फतच स्वच्छतेची चळवळ घराघरात पोहोचवायची आहे ,यामध्ये सर्वांनी आपला सहभाग नोंदवावा" असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी यावेळी केले.




**उल्हासनगर ।** केंद्र शासनाच्या निर्देशानुसार व मा. प्रशासक तथा आयुक्त विकास ढाकणे साहेब यांच्या आदेशानुसार, व मा. अतिरीक्त आयुक्त डॉ. किशोर गवस साहेब, मा. अतिरीक्त आयुक्त लेंगरेकर साहेब, मा. उप - आयुक्त डॉ. सुभाष जाधव साहेब यांच्या सूचनांनुसार तसेच मा. सहा. सार्वजनिक आरोग्य अधिकारी मनिष हिवरे साहेब, मा. मुख्य बाजार निरीक्षक विनोद केणे साहेब, मा. मुख्य स्वच्छता निरीक्षक एकनाथ पवार यांच्या मार्गदर्शनानुसार आज दिनांक 18/09/2024 रोजी प्रभाग समिती क्र 03, अंतर्गत पॅनल क्र 11 मध्ये एम. एम. ग्रूप, सार्वजनिक गणेश उत्सव मंडळ, स्टेशन रोड, उल्हासनगर - 3 येथे गणेश मंडळ परीसरात स्वच्छता ही सेवा अंतर्गत "स्वभाव स्वच्छता - संस्कार स्वच्छता" मोहीम नुसार विशेष सफाई अभियान राबविण्यात आले. सदर अभियानात एम. एम. ग्रूप सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाचे पदाधिकारी - सदस्य, मा. मुख्य नियंत्रक राजेश थिटे साहेब, सहा. नियंत्रक विजय गावित, मा. स्वच्छता निरीक्षक जितेंद्र राठी व आकाश शिंदे तसेच मुकादम व सफाई कर्मचारी उपस्थित होते.

# मुंब्र्यात 'ईद ए मिलाद' जुलूस

प्रतिनिधी
■ ठाणे

मुंब्र्यात बुधवारी (ता. १८) ईद- ए- मिलादचा जुलूस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मुस्लिम धर्मियांमध्ये ईद- ए- मिलाद हा दिवस मुस्लिम दिनदर्शिकेमध्ये पहिला दिवस पवित्र मानला जातो. ईद- ए- मिलादनिमित्त कळवा व मुंब्रा परिसरात मशिदीमध्ये विद्युत रोषणाई करण्यात आली होती.



प्रत्येक घरोघरी शिरखुर्मा हा गोड पदार्थ बनवण्यात आला होता. तसेच, मुंब्रा- कळवा परिसरात मुस्लिम धर्मियांनी मोठ्या उत्साहात मिरवणूक काढून मुस्लिम धर्मगुरू मोहंमद पैगंबर यांच्या नावाचा जल्लोष साजरा केला. त्यानिमित्त कळवा- टाकोली मोहल्ला, मुंब्रा रेल्वे स्थानक, कौसा आदी ठिकाणी बाजारपेठा सजल्या होत्या. मुस्लिम नागरिकांनी खरेदीसाठी गर्दी केली होती

# सहाशेहून अधिक नागरिकांनी जागृतेश्वर तलाव परिसर स्वच्छ करीत 'स्वच्छता ही सेवा' अभियानाचा केला शुभारंभ

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

स्वच्छता ही नियमित करण्याची गोष्ट असून स्वच्छतेमध्ये सातत्य राखणे गरजेचे आहे. यादृष्टीने 'स्वच्छ भारत मिशन'च्या वतीने 'स्वच्छता ही सेवा (SHS) पंधरवडा' जाहीर करण्यात आला असून या अंतर्गत राबविण्यात येणा-या 'स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता' अभियानात सर्व नवी मुंबईकर नागरिक उत्साहाने सहभागी होऊन हे अभियान यशस्वी करतील असा विश्वास नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी व्यक्त केला.




नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने 14 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर 2024 या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या स्वच्छता ही सेवा पंधरवड्याचा शुभारंभ वाशी सेक्टर 6 येथे जागृतेश्वर तलाव परिसर सखोल स्वच्छता मोहीमेव्दारे संपन्न झाला. यामध्ये नमुंमपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.कैलास शिंदे, माजी आमदार संदीप नाईक, 'स्वच्छ महाराष्ट्र मिशन'चे राज्य संचालक नवनाथ वाठ व उपआयुक्त मल्लिकार्जुन पाटील, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व शिरीष आरदवाड तसेच महानगरपालिकेचे विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी आणि -स्वच्छ नवी मुंबई मिशन'च्या वुमन आयकॉन श्रीम.रिचा समित व युथ आयकॉन नामांकित जलतरणपटू शुभम वनमाळी त्याचप्रमाणे विविध स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी, एनएसएसचे विद्यार्थी, शालेय विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डोंबिवलीतील सनदी लेखापाल, विकासकाकडून ज्येष्ठ नागरिक पती-पत्नीची फसवणूक

प्रतिनिधी
■ कल्याण

कल्याण पश्चिमेतील गोदरेज पार्क भागात एक गृहप्रकल्प उभारण्यात येत आहे. या प्रकल्पात आपण गुंतवणूक केली तर आपणास दुप्पट परतावा मिळेल किंवा पैशाच्या बदल्यात त्या गृहप्रकल्पात चार सदनिका देऊ, असे आश्वासन डोंबिवलीतील विकासक आणि एका सनदी लेखापालाने घाटकोपर पंतनगरमधील एका ७४ वर्षाच्या ज्येष्ठ नागरिकाला सहा वर्षापूर्वी दिले. दोघांच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन ज्येष्ठ नागरिकाने या प्रकल्पात एक कोटी २९ लाख रूपये गुंतवणूक केले. दरम्यानच्या काळात ज्येष्ठ नागरिकाला वाढीव परतावा नाहीच, पण गृहप्रकल्पातील सदनिका देण्यास आरोपींनी नकार दिल्याने ज्येष्ठ नागरिकाने खडकपाडा पोलीस ठाण्यात सोमवारी तक्रार केली आहे.

अश्विन रजनीकांत शहा असे तक्रारदार ज्येष्ठ नागरिकाचे नाव आहे. सनदी लेखापाल हरिश सत्रा, विकासक संतोष पांडे अशी गुन्हा दाखल आरोपींची नावे आहेत. ते डोंबिवलीतील रहिवासी आहेत. फेब्रुवारी २०१९ ते ऑगस्ट २०२४ या कालावधीत हा फसवणुकीचा प्रकार घडला आहे.

पोलिसांनी दिलेली माहिती अशी, आरोपी सनदी लेखापाल हरिश सत्रा, ओमसाई कन्स्ट्रक्शचे विकासक संतोष पांडे यांनी तक्रारदार अश्विन शहा आणि त्यांची पत्नी सुनिता यांना विश्वासात घेतले. त्यांना भोजनासाठी कल्याणमधील खडकपाडा भागातील गुरुदेव एनएक्स हॉटेलमध्ये भोजनासाठी नेले. आरोपींनी शहा यांच्या सोबत भोजन घेत असताना अश्विन शहा, त्यांची पत्नी सुनिता यांना आम्ही गोदरेज पार्क येथे जय गुरूदेव नावाने सात माळयाचा एक गृहप्रकल्प उभारत आहोत. हा प्रकल्प उभारणीसाठी आम्हाला पैशाची अडचण आहे. आपण या गृहप्रकल्पात पैसे गुंतवले तर आम्ही तुम्हाला या प्रकल्पात भागीदार करून घेऊ. किंवा तुम्हाला या प्रकल्पातील चार सदनिका देऊ. या गुंतवणुकीतून तुम्हाला चांगला फायदा होईल. आरोपींच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन तक्रारदार शहा यांनी एक कोटी १० लाखाचे धनादेश विकासक संतोष पांडे यांना लिहून दिले. १९ लाखाची रोख रक्कम सनदी लेखापाल सत्रा यांना दिली.

# युनेस्कोचे पथक सिंधुदुर्ग आणि विजयदुर्ग किल्ल्याला देणार भेट

**सावंतवाडी:** : युनेस्कोचे पथक दि. ६ व ७ ऑक्टोबर रोजी विजयदुर्ग, सिंधुदुर्ग किल्ल्याला भेट देणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी अनिल पाटील यांनी दिली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड किल्ल्यांचा जागतिक वारसास्थळांमध्ये समावेश करण्याच्या अनुषंगाने युनेस्कोचे पथक विजयदुर्ग आणि सिंधुदुर्ग किल्ल्याला भेट देणार आहे. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील नागरिक, स्वयंसेवी संस्था, पक्ष, संघटना, अधिकारी आणि कर्मचारी, ग्रामस्थ, एन.एस.एस, एन.सी.सी, विविध सामाजिक मंडळे, सामाजिक संस्था व शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी या दोन्ही किल्ल्यांच्या परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अनिल पाटील यांनी केले आहे. पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयामार्फत राज्यातील मराठा लष्करी स्थापत्य यांना युनेस्को जागतिक वारसा नामांकन मिळण्यासाठी नामांकन प्रस्ताव सादर केलेला आहे. जागतिक वारसा म्हणून किल्ले विजयदुर्ग व किल्ले सिंधुदुर्ग यांचे संवर्धन व संगोपण करण्याच्या अनुषंगाने युनेस्कोचे पथक दि.६ ऑक्टोबर






रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी खार येथे हिंदुस्थानी भाऊ यांनी आयोजित केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाला भेट दिली.



विद्याविहार खलई व्हिलेज येथील ओमकार मित्रमंडळ च्या गणेशोत्सवाला रिपब्लिकन पक्षाचे प्रसिद्धी प्रमुख हेमंत रणपिसे यांनी भेट दिली



प्रभाग क्र. 54 चे शिवसेना शाखाप्रमुख सुनीता बावधाने यांनी प्रभागातील पिंपळेश्वर मंदिर, संतोषी माता मंदिर, भाग्यलक्ष्मी सोसायटी, रामनगर, हनुमान मित्र मंडळ, ओम साई राम, नवयुवक यांच्यासह अनेक सार्वजनिक मंडळांना पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह भेटी देऊन गणरायांचे आशीर्वाद घेतले.



सावंत कुटुंबियांचा मारळ, रत्नागिरी येथील घरचा लाडका गणराज.



दळवी आणि कवटकर कुटुंबीयांचा गणपती बाप्पा



आचरेकरांच्या गणरायाचे विसर्जन

# ...नाहीतर राजकीय करिअर उद्ध्वस्त करू

## जरांगेंचा फडणवीसांना इशारा

प्रतिनिधी
■ जालना

विधानसभा निवडणुकांच्या आधी राज्य सरकारला शेवटची संधी आहे, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आरक्षणाचे अस्त्र उपसले आहे. जालन्यामध्ये सुरु असलेल्या जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आज दुसरा दिवस असून त्यांची प्रकृती खालावल्याचे समोर आले. आज सकाळी आरोग्य विभागाच्या डॉक्टरांच्या पथकाने त्यांची तपासणी केली.

यावेळी जरांगे यांची शुगर डाऊन झाली असून ब्लड प्रेशर आणि ऑक्सिजन लेवल नॉर्मल असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. जरांगे यांचा



अशक्तपणा वाढला असल्याने त्यांना उपचार घेण्याची विनंती यावेळी डॉक्टरांनी केली मात्र त्यासाठी त्यांनी नकार दिला. तसेच यावेळी मराठा आरक्षणावरुन त्यांनी राज्य सरकारला पुन्हा एकदा इशारा दिला आहे.

"एक वर्ष झालं आम्ही सरकारला सहकार्य करत आहोत. अजून किती दिवस तुम्हाला सहकार्य करायंच? फडणवीस साहेबांनी आमच्या मागणीची तातडीने अंमलबजावणी केली पाहिजे, आमच्या व्याख्येप्रमाणे सगे सोयरेची अंमलबजावणी तातडीने केली पाहिजे. तसेच हैद्राबादसह, सातारा, बॉम्हे हे तिन्ही गॅजेट दोन-तीन दिवसाच्या आत लागू करा, ही सरकारची जबाबदारी आहे. मी राजकीय भाषा बोलत नाही पण माझ्या मागण्या दोन दिवसात पूर्ण करत नाही तर येत्या काळात तुम्हाला अवघड दिवस असणार आहेत," असा थेट इशारा जरांगे पाटील यांनी दिला.

"फडणवीस साहेबांना संधी दिली आहे त्यांनी आमच्या मागण्यांकडे विशेष लक्ष घालावे. नाहीतर मराठ्यांचे कल्याण न होऊन द्यायला फडणवीस दोषी असतील. गरिबांवर मराठ्यांवर अन्याय करणारा फडणवीसंच आहे, आम्हाला राजकारणाशी देणंघेणं नाही, पण नंतर मला पाडापाडी कशी झाली? उभे कसे केले असं म्हणायचं नाही. या दोन-तीन दिवसात सगळे विषया मार्गी लावा. संधी दिली त्याची फडणवीस साहेबांनी सोने करावे. धनगर, मुस्लिम, शेतकरी यांना सरकारने नुसतं वेड्यात काढले आहे, मागणी मान्य करा नाहीतर 2024 ला राजकीय करिअर उद्ध्वस्त करून टाकेल?" असा घणाघातही जरांगेंनी केला.

# मिटकरींची गाडी फोडणारा मनसैनिक जय मालोकारचा मृत्यू हार्ट अटॅकमुळे नाही

## पोस्टमॉर्टम रिपोर्टमधून धक्कादायक खुलासा

प्रतिनिधी
■ नांदेड

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरींच्या वाहनाची तोडफोड करणाऱ्या मनसैनिक जय मालोकारच्या मृत्यूला वेगळं वळण मिळत आहे. जय मालोकारचा शवविच्छेदन अहवाल समोर आला असून, मारहाणीमुळे मृत्यू झाल्याचं उघड झालं आहे. सुरुवातीला हृदयविकाराच्या झटक्याने जय मालोकारचा मृत्यू झाल्याचा दावा केला जात होता. मात्र आता पोस्टमॉर्टम रिपोर्ट समोर आल्यानंतर याला वेगळं मिळालं असून खळबळ उडाली आहे.

जय मालोकार हा मनसे कार्यकर्ता होता. अमोल मिटकरी यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावर टीका करताना त्यांना सुपारीबहाद्दर म्हटलं होतं. राज ठाकरेंनी अजित पवार नसतानाही पुण्यातील धरण भरलं असं उपहासात्मकपणे म्हटल्यानंतर अमोल मिटकरी यांनी ही टीका केली होती. मात्र ही टीका मनसे कार्यकर्त्यांच्या जिव्हारी लागली होती. त्यामुळे मनसे कार्यकर्त्यांनी अकोल्यात अमोल मिटकरी यांच्या गाडीवर हल्ला केला होता.

अमोल मिटकरी अकोल्यात विश्रामगृहात असताना मनसैनिक तिथे पोहोचले होते आणि बाहेर उभी कार फोडली होती. यावेळी मनसे आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये तुफान राडा झाला होता. या राड्यानंतर जय मालोकरला अस्वस्थ वाटू लागलं होतं. त्यामुळे जयला रुग्णालयात दाखल करण्यात



आलं होतं. उपचार सुरु असतानाच त्याचा मृत्यू झाला होता.

जय हा मनसेच्या विद्यार्थी सेनेचा जिल्हा उपाध्यक्ष होता. तसेच परभणी येथे होमिओपॅथी अभ्यासक्रमाच्या तिसऱ्या वर्षात शिकत होता. जय मालोकारच्या मृत्यूनंतर राज ठाकरे आणि अमित ठाकरे यांनी अकोल्यात त्याच्या कुटुंबीयांची भेट घेतली होती. राज ठाकरे अकोला दौऱ्यावर असताना कुटुंबीयांचं सांत्वन करण्यासाठी पोहोचले होते. अमोल मिटकरींसोबत झालेल्या राड्याच्या ताणातूनच जय यांचा मृत्यू झाल्याचा आरोप मनसेनं केला होता.

दुसरीकडे अमोल मिटकरी यांनी जय मालोकार राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार असल्यामुळेच त्याच्यासोबत काहीतरी अघटित घडल्याचा संशय व्यक्त केला होता. शासकीय विश्रामगृहाबाहेर झालेल्या राड्यानंतर जय मालोकारसोबत कोण होते? हे समोर आले तर या संपूर्ण प्रकरणातील धक्कादायक सत्य बाहेर येईल. अकोला पोलिसांनी या सगळ्या गोष्टींचा तपास करावा, अशी मागणी मिटकरी यांनी केली होती.

# खा. अनिल बोंडे यांच्याविरुद्ध गुन्हा

## राहुल गांधींच्या जिभेला चटके देण्याचे भोवले विधान

प्रतिनिधी
■ अमरावती

राहुल गांधी यांच्या वक्तव्याचा विपर्यास करुन त्यांच्याविरुद्ध गरळ ओकणारे राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे यांच्यावर येथील राजापेठ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष भय्या पवार यांच्या तक्रारीवरुन हा गुन्हा दाखल करण्यात आला. तत्पूर्वी याच मागणीसाठी काँग्रेसचे अमरावतीचे खासदार बळवंतराव वानखडे व पक्षश्रेष्ठींनी आज, बुधवारी पोलिस आयुक्तांच्या दालनात आंदोलन केले. या आंदोलनामुळे अमरावतीत खासदाराविरुद्ध खासदार असे चित्र निर्माण झाले आहे.

माजी पालकमंत्री आमदार ॲड. यशोमती ठाकूर, माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, माजी आमदार प्रा. वीरेंद्र जगताप, दोन्ही जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख व बबलू शेखावत, प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष भय्या पवार, माजी महापौर विलास इंगोले, काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते मिलींद चिमोटे आदी या आंदोलनात सहभागी झाले होते. आरक्षणविषयक वक्तव्यावरुन भाजपचे जिल्हाध्यक्ष असलेल्या डॉ. बोंडे यांनी राहुल गांधी यांच्या जिभेला चटके द्या, असे वक्तव्य केले आहे. सार्वजनिक ठिकाणी केलेल्या या वक्तव्यामुळे जनमानसात तेढ निर्माण झाले आहे. ते गेल्या तीन-चार महिन्यांपासून असे बेताल विधान करत आहेत. त्यामुळे भविष्यातील तेढ टाळण्यासाठी डॉ. अनिल बोंडे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करुन त्यांना तत्काळ अटक करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

आयुक्त कार्यालयातील या आंदोलनानंतर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष भय्या पवार यांनी राजापेठ पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली. त्यांच्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# चिमुकलीवर अत्याचार होत असताना गृहमंत्री घाणेरड्या राजकरणात व्यस्त

## आदित्य ठाकरेंचा घणाघात

प्रतिनिधी
■ नागपूर

नागपुरात 8 वर्षीय मुलीवर अत्याचार झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणाने पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. महाराष्ट्रात महिला व मुलींवरील अत्याचारात वाढ झाल्याचे दिसत आहे. मात्र यावर अद्याप ठोस कारवाई केली जात नसल्याने युवसेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी महायुती सरकारवर निशाणा साधला आहे. निर्लज्ज, गद्दार मुख्यमंत्री सध्या सेलेब्रिटींसोबत फोटो काढण्यात व्यस्त आहेत, तर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस हे घाणेरडं राजकारण करण्यात व्यस्त आहेत, असा घणाघात आदित्य ठाकरे यांनी केला आहे.



आदित्य ठाकरे एक्स या समाज माध्यमावर पोस्ट शेअर करत म्हणाले, महाराष्ट्रात असंवैधानिक, गद्दार मिंधे मुख्यमंत्री पदावर बसले आहेत. सध्या ते सेलिब्रिटींसोबत फोटो काढण्यात मग्न आहे. फोटोमध्ये ते इतके व्यस्त आहेत की, त्यांनी महाराष्ट्र वाऱ्यावर सोडला आहे. राज्यात कायदा आणि सुव्यवस्था आहे की नाही? असा सवाल सध्या उपस्थित होत आहे. तर दुसरीकडे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस हे घाणेरडे राजकारण करण्यात व्यस्त आहेत.

नागपूर येथे 8 वर्षीय चिमुकल्या मुलीवर अत्याचार झाल्याची घटना घडली आहे. ही घटना पारडी पोलिस स्थानाकाच्या हद्दीत घडल्याचे समोर आले आहे. आरोपीचे स्केच तयार करून त्याचा तपास पोलिस घेत आहेत. आरोपीची ओळख पटत नसल्याने त्याचे स्केच तयार करून तपास करण्यास सुरुवात केली आहे. पीडित मुलीची प्रकृती ठीक तिच्यावर घरीच वैद्यकीय उपचार सुरू आहेत.

# पुण्यातील काही गणपती मंडळांवर होणार कारवाई

पुणे पोलीस आयुक्तांची माहिती

प्रतिनिधी
■ पुणे

देशासह राज्यभरातील गणेश भक्तांनी लाडक्या गणपती बाप्पाला जड अंत:करणाने निरोप दिला. पुण्यातील विसर्जन मिरवणुका कोणत्याही विघ्नाविना शांततेत पार पडल्या. मंगळवारी सुरू झालेल्या मिरवणुका आज दुपारी तीन वाजता संपल्या आहेत. पुणे पोलिसांकडून मिरवणूक संपल्या असं जाहीर करण्यात आलं आहे. तब्बल 28 तास पुण्यातील विसर्जन मिरवणुका सुरू होत्या. पुणे पोलीस आयुक्तांनी मिरवणुका संपल्यावर बोलताना काही मंडळांवर कारवाई होणार असल्याची माहिती दिली आहे. पुण्यातील गणपती विसर्जन मिरवणुका 28 तास मिरवणूक सुरू होत्या. पुण्यामध्ये 8 हजार अधिकारी कर्मचारी बंदोबस्तात तैनात होते. शांततेत गणेशोत्सव पार पडला त्याबद्दल सर्व मंडळ आणि भक्तांना धन्यवाद. यंदाच्या वर्षी मिरणुकांमध्ये लेजरवर पूर्ण पणे बंदी होती.

# लातुर जिल्यातील औसा येथे भव्य तक्षशिला बुध्द विहाराचे रामदास आठवले यांच्या हस्ते लोकार्पण

प्रतिनिधी
■ लातुर

महाकारुणीक तथागत भगवान बुध्दांनी विश्वाला शांतीचा महान संदेश दिला. जगाला सर्वप्रथम शांती, अहिंसा, समता, बंधुता या तत्वांची शिकवण भगवान बुध्दांनी दिली. भगवान बुध्दांनी दिलेल्या धम्मानेच जगाला सर्वप्रथम लोकतंत्राची बहुजन हिताय बहुजन सुखाय या मंत्राने ओळख करुन दिली असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी केले.

लातुर जिल्हयाती औसा येथे आमदार अभिमन्यु पवार यांच्या प्रयत्नातुन भव्य तक्षशिला बुध्द विहाराचे निर्माण करण्यात आले आहे. 2 एकरच्या परिसरात



भव्य तक्षशिला बुध्द विहार उभारण्यात आले आहे. या बुध्द विहाराचे लोकार्पण ना. रामदास आठवले यांच्या हस्ते आज करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

तक्षशिला बुध्दविहाराचे लोकार्पण प्रसंगी औसा येथे भव्य प्रमाणात जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती.

या सभेत ना. रामदास आठवले यांनी आपले विचार मांडले. यावेळी अध्यक्षस्थानी स्थानिक आमदार अभिमन्यु पवार प्रमुख अतिथी म्हणून गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, माजी आमदार बसवराज पाटील, रिपब्लिकन पक्षाचे बाबासाहेब कांबळे, डी.एम. दाभाडे, ब्रम्हानंद रेड्डी, बौध्द भंते उपगुप्त महाथेरो भदंत पय्यानंद महाथेरो आणि भिख्खु संघ मोठया संख्येत उपस्थित होते. आदि अनेक मान्यंवर उपस्थित होते.

# पत्नी, 9 वर्षांच्या मुलीसह एकाची आत्महत्या

## नाशिकच्या बॉश कंपनीवर कुटुंबीयांचा आरोप

प्रतिनिधी
■ नाशिक

नाशिकमधील गौळने गावातील विजय सहाने यांनी आपल्या कुटुंबासोबत आत्महत्या केल्याने नाशिक शहरात एकच खळबळ उडाली. बॉस कंपनीत कामगार असलेल्या विजय सहाने यांच्या आत्महत्येनंतर कुटुंबीयांनी कंपनीवर आरोप केले आहेत. विजयच्या आत्महत्येचे कारण हे कंपनीतील प्रशासन असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.

नाशिकच्या बॉश कंपनीमध्ये विजय सहाने हे गेल्या बारा वर्षांपासून कामावर आहेत. कंपनीच्या जाचक नियमांमुळे विजय हे गेल्या अनेक दिवसांपासून अस्वस्थ होते आणि त्यामुळे त्यांनी आपली पत्नी आणि नऊ वर्षाच्या मुलीसोबत आत्महत्या केल्याचं पाऊल उचललं असल्याची माहिती विजयच्या कुटुंबांनी दिली. विजयच्या कुटुंबीयांनी बॉश कंपनीवर गंभीर आरोप




केल्यानंतर या आत्महत्या प्रकरणाला एक वेगळेच वळण लागल्याचं पाहायला मिळत आहे. विजय सहाणे यांनी त्यांच्या राहत्या घरी कुटुंबासोबत आत्महत्या केल्यानंतर नाशिकच्या जिल्हा रुग्णालयात इगतपुरी त्र्यंबकेश्वर विधानसभा मतदारसंघाचे आमदार हिरामण खोसकर यांनी देखील भेट दिली. सहाने कुटुंबाच्या आत्महत्येनंतर कुटुंबांने केलेल्या आरोपाची सखोल चौकशी व्हावी आणि यासंदर्भात नाशिक पोलिसांनी देखील गांभीर्याने तपास करावा असे निर्देश आमदार खोसकर यांनी दिले. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करत सीबीआयच्या माध्यमातून तपास करावा आणि संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

सहाने कुटुंबाच्या आत्महत्येनंतर माध्यमांनी बॉस कंपनी प्रशासनासोबत देखील बोलण्याचा प्रयत्न केला. बॉस कंपनी संबंधित अधिकाऱ्यांनी प्रतिसाद दिला नसल्याने कंपनी प्रशासनावरील संशय अधिकच गडद होत आहे. मात्र या संदर्भात इंदिरानगर पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.

## बाप्पाला निरोप देताना दोघांचा पूर्णा नदी बुडून मृत्यू

प्रतिनिधी
■ अमरावती

इसापूर गावातील दोन व्यक्ती पूर्णा नदीपात्रात गणपती विसर्जन करताना बुडाल्यानं खळबळ उडाली आहे. अमोल विष्णू ठाकरे (45) आणि मयूर गजानन ठाकरे (25) अशी मृत व्यक्तींची नावं आहेत. या दोघांचेही मृतदेह आज सकाळी बचाव पथकाला सापडले. तर मंगळवारी सायंकाळी ही घटना घडली.

अचलपूर तालुक्यातून वाहणाऱ्या पूर्णा नदीत अचलपूर, अंजनगाव, अमरावती तालुक्यातील अनेक गावांमधून गणपती विसर्जनाकरता येतात. मंगळवारी सायंकाळी गणपती विसर्जनाकरता नदीवर गर्दी उसळली होती, सायंकाळी सव्वा सहाच्या सुमारास अमोल ठाकरे आणि मयूर ठाकरे हे दोघे गणपती विसर्जन करताना नदीत बुडाल्यानं परिसरात खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच, जिल्हा आपत्कालीन विभाग बचाव पथक घटनास्थळी दाखल झालं.

# पत्नीचा खून केल्यानंतर पोलीस कर्मचारी ठाण्यात हजर

प्रतिनिधी
■ नांदेड

एकीकडे गणेशोत्सवाची धामधूम सुरु होती. गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस कर्तव्यावर होते. याच दरम्यान एका पोलीस कर्मचाऱ्याने आपल्या सर्व्हिस रिव्हॉल्वरमधून गोळी झाडून पत्नीचा खून केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (दि.१७) सायंकाळी ६ च्या सुमारास धनेगाव परिसरातील आयडियल सोसायटीत घडली. पत्नीचा खून केल्यानंतर पोलीस कर्मचाऱ्याने स्वतः पोलीस ठाण्यात हजर होऊन पोलिसांना माहिती दिली. अफजल पठाण असं या कर्मचाऱ्याचे नाव आहे.

अफजल पठाण हा आपल्या कुटुंबीयांसोबत धनेगाव परिसरातील आयडियल सोसायटी येथे राहतो. विमानतळ पोलीस ठाण्यात तो हेड कॉन्सस्टेबलपदी कार्यरत आहेत. पत्नी नाजीम बेगमसोबत त्याचे नेहमी छोट्या छोट्या कारणावरून वाद होत असायचे. अफजल पठाण मंगळवारी सायंकाळी ड्युटी करून घरी गेला. यावेळी दोघांमध्ये वाद झाला. हा वाद एवढा टोकाला गेला की, पोलीस कर्मचाऱ्याने स्वतः जवळील सर्व्हिस रिव्हॉल्वरमधून पत्नीवर गोळी झाडली. या घटनेनंतर नाजीम बेगमचा जागीच मृत्यू झाला.

गोळीचा आवाज एकूण परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. दरम्यान पत्नीवर गोळी झाडल्यानंतर आरोपी अफजल पठाण हा ग्रामीण पोलीस ठाण्यात हजर झाला आणि पोलिसांना घटनेची माहिती दिली. यावेळी ठाण्यातील पोलिसांना देखील धक्काच बसला. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. आरोपी अफजल पठाण हा मद्यधुंद अवस्थेत होता, अशी देखील माहिती आहे. त्यांना दोन मुलं असून दोघेही शिक्षणासाठी बाहेर गावी आहेत. किरकोळ वादातून पत्नीचा गोळी झाडून खून केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. दरम्यान याप्रकरणी ग्रामीण पोलिसांनी खूनाचा गुन्हा दाखल केला आहे.



कुर्ला नेहरू नगर येथील कर्मसंकेत अपार्टमेंट येथे श्री नीलकंठेश्वर मंदिर परिसरात नीलकंठेश्वर सेवा मंडळाच्या वतीने गेली ३४ वर्ष सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला जात आहे. सोसायटीचे अध्यक्ष प्रकाश कांडरकर यांच्या मार्गदर्शनाखाली गणेशोत्सव उत्सव समिती अध्यक्ष नितीन कांडरकर, सरचिटणीस संतोष पवार, खजिनदार अक्षय पाटील, उपाध्यक्ष अनंत नाईक आदिसह कार्यकर्ते उत्सव यशस्वी करण्यासाठी मेहनत घेत आहेत.



ह्यूमन राईट असोसिएशन फॉर प्रोटेक्शनचे जिल्हा सचिव अर्जुन (काका) परब यांच्या निवासस्थानी श्रीची स्थापना करण्यात आली होती. याप्रसंगी गणरायाचे दर्शन घेण्यासाठी जिल्हाध्यक्ष सुधीर धुरी, मालवण तालुका जनसंपर्क अधिकारी रोहित हडकर, मालवण तालुका सदस्य तुकाराम माळकर, शरद परब आदी उपस्थित होते.

## राज्य तायक्वांदो अध्यक्षपदी संदीप ओंबासे यांची निवड

**मुंबई :** तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (टाम) या राज्य संघटनेच्या अध्यक्षपदी संदीप ओंबासे (ठाणे) तर सचिवपदी गफार पठाण (सातारा) यांची एकमताने निवड करण्यात आली. देशातील शिखर संघटना इंडिया तायक्वांदो च्या मान्यतेने तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (टाम) या संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा नंदी पॅलेस हॉटेल डोंबिवली येथे संपन्न झाली. या सभेत पंचवार्षिक कार्यकारिणी घोषित करण्यात आली. या बैठकीसाठी महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या वतीने निरीक्षक म्हणून दयानंद कुमार यांनी तर निवडणूक अधिकारी म्हणून ऍडव्होकेट शुभांगी सोनवले यांनी काम पाहिले. संघटनेचे चेअरमन म्हणून नागपूरचे आमदार मोहनभाऊ मते तर कोषाध्यक्ष म्हणून छ.संभाजीनगर चे प्रसाद कुलकर्णी यांची निवड करण्यात आली.



चायना ओपन बॅडमिंटन

## नागपूरकर मालविकाने ऑलिम्पिक ब्रॉन्झ मेडलिस्ट ग्रेगोरियाला हरवले

वृत्तसंस्था
■ चांगझोऊ



भारताच्या मालविका बनसोडने चीनमधील चांगझोऊ येथे सुरू असलेल्या चायना ओपन बॅडमिंटन स्पर्धेत महिला एकेरीत मोठा उलटफेर केला आहे. तिने स्पर्धेच्या पहिल्या फेरीत पॅरिस ऑलिम्पिक 2024 कांस्यपदक विजेती ग्रेगोरिया तुनजुंगचा पराभव केला आहे. या सामन्यात इंडोनेशियाच्या जागतिक क्र. 7 बॅडमिंटनपटूला फेव्हरेट मानले जात होते. पण भारताच्या मालविका बनसोडने चमकदार कामगिरी करत हा सामना 26-24, 21-19 असा सरळ सेटमध्ये जिंकला. हा तिच्या कारकिर्दीतील सर्वात मोठा विजय आहे.

23 वर्षीय मालविकाने पहिल्याच गेमपासून तुनजुंगवर दबाव आणला. तिने एका वेळी 18-12 अशी आघाडी घेतली आणि गेम जिंकण्याच्या जवळ पोहोचली. पण इथे इंडोनेशियाच्या तुनजुंगने पुनरागमन करत अखेरच्या मिनिटाला 8 गुण मिळवत सामना टायब्रेकरवर नेला. मालविकाने हा टायब्रेकर 26-24 असा जिंकून सामन्यात 1-0 अशी आघाडी घेतली.तुनजुंगने दुसऱ्या गेममध्ये शानदार खेळ केला आणि पहिला गेम गमावल्यानंतरही दुसऱ्या गेममध्ये कडवी झुंज दिली. या गेमच्या शेवटच्या क्षणी दोन्ही खेळाडू समान गुणांवर होते (19-19). यानंतर मालविकाने सलग 2 गुण घेत 21-19 असा विजय मिळवला.

पाकड्यांच्या भारतद्वेष कायम

## एशियन चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये पाकने चीनला केला सपोर्ट

### भारताविरुद्धच्या फायनलमध्ये पाकचे खेळाडू चीनचा झेंडा फडकावताना दिसले

वृत्तसंस्था
■ बीजिंग

आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात चीनला पाठिंबा दिल्याने पाकिस्तानच्या हॉकी संघाला ट्रोल करण्यात येत आहे. मंगळवारी भारत आणि चीन यांच्यात अंतिम सामना झाला, ज्यामध्ये भारताने 1-0 असा विजय मिळवला. यादरम्यान पाकिस्तानी खेळाडू स्टेडियममध्ये चीनचा झेंडा हातात घेऊन बसलेले दिसले.

इतकेच नाही तर सामन्यात अनेकदा पंचांचे असे निर्णय भारताच्या विरोधात गेले, जे चीनच्या विरोधात जायला हवे होते. या सामन्यातील रेफ्रीही पाकिस्तानचा हारून रशीद होता, त्यामुळे त्याच्यावर भेदभावाचा आरोप होत आहे.



आशियाई हॉकी चॅम्पियन्स ट्रॉफीचा अंतिम सामना संपल्यानंतर पाकिस्तानी खेळाडूंचे काही फोटो सोशल मीडियावर समोर आले आहेत. फोटोमध्ये चीनमधील हुलानबुईर येथील मोकी स्टेडियममध्ये खेळाडू चीनचा ध्वज हातात घेतलेले दिसत होते. अंतिम फेरीदरम्यान खेळाडू झेंडा फडकावतानाही दिसले.

***भारताला खराब अंपायरिंगचा सामना करावा लागला***

*चीनविरुद्धच्या अंतिम सामन्यातही भारताला खराब अंपायरिंगचा सामना करावा लागला होता. 3 क्वार्टरपर्यंत दोन्ही संघांना एकही गोल करता आला नाही. या काळात पंचांचे अनेक निर्णय भारताच्या विरोधात होते. चीनच्या संघाला 39व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नर देण्यात आला. ज्याचा भारताने रिव्ह्यू घेतला, पण निर्णय भारताच्या विरोधात गेला. या सामन्यात पाकिस्तानी रेफ्री हारून रशीद यांनी भेदभाव केल्याचा दावा सोशल मीडियावर केला जात आहे. ते चीनच्या समर्थनार्थ निर्णय देत होते.*

## सुपर लीग सांघिक कॅरम स्पर्धेत आनंदराव प्लॅटीनियम अजिंक्य




प्रतिनिधी
■ मुंबई

माजी केंद्रीय राज्य अर्थमंत्री आनंदराव अडसूळ वाढदिवस चषक शालेय-कॉलेज ज्युनियर खेळाडूंच्या सुपर लीग कॅरम स्पर्धेत आनंदराव प्लॅटीनियम संघाने अजिंक्यपद पटकाविले. सुपर लीगचे सर्व सामने जिंकणाऱ्या आनंदराव प्लॅटीनियम संघाने अंतिम फेरीत अभिजित कॅप्टन्सीचा २-१ असा पराभव करून विजेतेपदाला गवसणी घातली. आनंदराव प्लॅटीनियमच्या विजयाचे शिल्पकार चारही सामन्यात अपराजित राहिलेले भव्या सोळंकी व प्रसन्ना गोळे ठरले. सांघिक लीग व अंतिम सामन्यात विजयी खेळ करणाऱ्या पुष्कर गोळेने अप्रतिम खेळ करूनही अभिजित कॅप्टनसीला अंतिम उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ माजी केंद्रीय अर्थ राज्य मंत्री आनंदराव अडसूळ यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी को-ऑप. बँक एम्प्लॉईज युनियनचे कार्याध्यक्ष सुनील साळवी, खजिनदार प्रमोद पार्टे, सहखजिनदार जनार्दन मोरे, प्रमुख पंच चंद्रकांत करंगुटकर व शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण उपस्थित होते.

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी व सुमती सेवा मंडळ-दहिसरतर्फे को-ऑप. बँक एम्प्लॉईज युनियन, मुंबई व माहीम ज्युवेनील स्पोर्ट्स क्लब सहकार्याने माजी केंद्रीय राज्य अर्थमंत्री आनंदराव अडसूळ यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून झालेल्या सुपर लीग सांघिक कॅरम स्पर्धेचा शिवाजी पार्क येथे अंतिम सामना चुरशीचा झाला. पुष्कर गोळेने आनंदराव संघाच्या कुलदीप चुडासामाचा १८-० असा सहज पराभव करून अभिजित संघाला १-० अशी धडाकेबाज आघाडी मिळवून दिली. परंतु त्यानंतर भव्या सोळंकीने अभिजित संघाचा कर्णधार सार्थक केरकरला ११-० असे सहज हरवून आनंदराव संघाला १-१ अशी बरोबरी साधून दिली. निर्णायक सामन्यात आनंदराव संघाचा हुकुमी कॅरमपटू प्रसन्ना गोळेने अभिजित संघाच्या अद्वैत पालांडेचा १५-७ असा चुरशीचा पराभव केला आणि आनंदराव संघाच्या विजेतेपदावर २-१ असा शिक्कामोर्तब केला. स्पर्धेतील तृतीय क्रमांक वेदांत पाटणकर, तृशांत कांबळी, अर्णव गावडे, उमर पठाण यांच्या आयडियल चॅम्पस संघाने मिळविला. याप्रसंगी मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अजिंक्य नाईक, सेक्रेटरी अभय हडप व असिस्टंट सेक्रेटरी दीपक पाटील यांचा शाल व श्रीफळ देऊन माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री आनंदराव अडसूळ यांनी सत्कार केला. शालेय व महविद्यालयीन विविध जिल्ह्यातील खेळाडूंनी तसेच पालक-शिक्षक वर्गाने वाढदिवसाच्या प्रार्थनेसह शुभेच्छांच्या गौरवानी भारावलेल्या आनंदराव अडसूळ यांनी संयोजकांना शालेय स्पर्धांसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

## पीयूष गोयल यांनी भक्तांच्या उत्साहाचे कौतुक करत बाप्पाला दिला भावपूर्ण निरोप

प्रतिनिधी
■ मुंबई

संपूर्ण मुंबई शहर "गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या, भगवान गणपती" अशा घोषणांनी दुमदुमले आणि त्याच भक्तिमय वातावरणात केंद्रीय मंत्री आणि उत्तर मुंबईचे खासदार पीयूष गोयल यांनी गणपती बाप्पाला भावपुर्ण निरोप दिला. त्यांच्या मतदारसंघात, मालाडमध्ये विसर्जन सोहळा. महापालिका, भाजप कार्यकर्ते आणि पोलिसांनी कडेकोट व्यवस्था ठेवली होती आणि प्रत्येक रस्त्यावर आणि गल्लीत भाविकांची गर्दी झाली होती. ढोल-ताशा आणि पारंपारिक वाद्यांच्या तालावर नाचत गणपतीच्या सुंदर सजवलेल्या मूर्तींना भाविकांनी निरोप दिला.

यावेळी, वाणिज्य आणि उद्योग मंत्री गोयल यांनी महिला, मुले आणि सर्व गणेश भक्तांना धन्यवाद दिले, तसेच पक्षाच्या पदाधिकारी आणि




कार्यकर्त्यांच्या बांधिलकीबाबत त्यांचे कौतुक केले. भुजळे तलाव येथे भाजपचे मालाड विधान सभा अध्यक्ष सुनील कोळी यांनी आयोजित केलेल्या या विसर्जन समारंभात गोयल यांनी गणेशोत्सव हा केवळ उत्सव नसून तो भक्तीभाव समाजातील सर्व घटकांना, विशेषत: तरुणांना एकत्र आणतो, असे नमूद केले.

पक्षाच्या अनेक कार्यकर्त्यांनी त्यांच्यासोबत सेल्फी काढले. उल्लेखनीय म्हणजे, गणेशोत्सवाच्या दहा दिवसांमध्ये, भाजपचे ज्येष्ठ नेते गोयल यांनी भक्ती आणि श्रद्धेची भावना दृढ करण्यासाठी सुमारे ५० गणेश मंडळांना भेटी दिल्या, त्यापैकी बहुतेक उत्तर मुंबईत आहेत. दोन दिवसांपूर्वी त्यांनी आपल्या कुटुंबासह प्रसिद्ध लालबागचा राजा गणेश मंडळाला भेट देऊन मुंबई आणि देशाच्या समृद्धी आणि विकासासाठी प्रार्थना केली होती. यावेळी त्यांनी लालबागच्या राजासोबतच्या त्यांच्या ३२ वर्षांच्या आठवणीही सांगितल्या.




***मुंबई : शिवसेना दक्षिण मुंबई विभाग क्र. १४ तर्फे राहुल गांधी यांच्या आरक्षण विरोधी वक्तव्याचा निषेध करणाऱ्यांसाठी चिराबाजार येथील दक्षिण मुंबई मध्यवर्ती कार्यालयाबाहेर आंदोलन केले. विभाग प्रमुख दिलीप नाईक साहेब यांच्या नेतृत्वाखाली, तसेच महिला विभाग प्रमुख नीलम पवार आणि विभाग संघटक विजय वाडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत राहुल गांधी यांचा धिक्कार आंदोलन करण्यात आले. या वेळी दक्षिण मुंबईतील पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.***

## गणेश मूर्ती विसर्जन सोहळ्यानंतर 18 तासात काढले 14,370 बॅनर, फलक



प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महानगरातील गणेशोत्सवातील अनंत चतुर्दशी निमित्त प्रमुख मूर्ती विसर्जन आटोपल्यानंतर काल परवा मध्यरात्रीनंतर १२.३० वाजेपासून बॅनर, फलक आणि इतर प्रदर्शित साहित्य हटविण्याची कार्यवाही महानगरपालिकेच्या अनुज्ञापन खात्याने हाती घेतली आहे. या अंतर्गत काल सायंकाळी सहा वाजेपर्यंत एकूण १४ हजार ३७० इतके साहित्य काढून टाकण्यात आले आहे.

यामध्ये प्रामुख्याने गणेशोत्सवामध्ये प्रदर्शित करण्यासाठी परवानगी दिलेले साहित्य समाविष्ट आहे. परवानगीची मुदत संपल्याने ते काढून टाकण्यात आले आहे. त्या व्यतिरिक्त अनधिकृतरित्या प्रदर्शित केलेले बॅनर, फलक, तात्पुरते प्रवेशद्वार, भित्तीपत्रके अशा सर्व बाबींचा देखील या कार्यवाहीमध्ये समावेश आहे.

अनुज्ञापन खात्याने हटवलेल्या साहित्यात धार्मिक स्वरूपाचे ७ हजार ७१५ बॅनर, ३ हजार १७४ फलक (बोर्ड) आणि ५७९ पोस्टर्स; राजकीय स्वरूपाचे ८०७ बॅनर, ७०५ फलक (बोर्ड), ८७ पोस्टर्स; व्यावसायिक स्वरूपाचे २६० बॅनर, २७ फलक (बोर्ड), ३१ पोस्टर्स तसेच ९८५ झेंडे यांचा यामध्ये समावेश आहे. ही कारवाई निरंतर सुरू ठेवण्यात येणार आहे.असे पालिकेने स्पष्ट केले आहे.

## विसर्जनासाठी आलेले हार, फुले यांचे निर्माल्य जमा करत श्रीसदस्यांकडून खतनिर्मिती

### डॉ नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचा अभिनव उपक्रम

प्रतिनिधी
■ मुंबई

गणपती बाप्पा मोरया , पुढच्या वर्षी लवकर या म्हणत आपल्या लाडक्या गणपती बाप्पाला भाविकांनी मंगळवारी वाजत गाजत , गुलाल उधळत भक्तिपूर्ण वातावरणात विसर्जन केले. गिरगाव चौपाटी , जुहू चौपाटी , उपनगरातील पवई तलाव , तसेच महानगर पालिकेने बांधलेले कृत्रिम तलावात यावेळी मोठ्या उत्साहात गणेश मूर्तीचे विसर्जन करण्यात आले.

यावेळी डॉ नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान तर्फे निर्माल्यापासून खतनिर्मिती हा स्तुत्य उपक्रम गिरगाव चौपाटी आणि जुहू चौपाटी येथे राबविण्यात आला. पद्म, महाराष्ट्र भूषण डॉ आप्पासाहेब धर्माधिकारी आणि रायगड भूषण डॉ सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिष्ठानच्या दहा हजार श्रीसदस्यांनी गिरगाव चौपाटी आणि जुहू चौपाटी येथे गणेश विसर्जनासाठी आलेल्या भाविकांकडून निर्माल्य नदीत ,



समुद्रात , तलावात विसर्जित न करता जमा केले.भाविकांनी देखील प्रतिष्ठानच्या या मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद दाखवत आपल्याकडील निर्माल्य श्रीसदस्यांकडे जमा केले. प्रतिष्ठानच्या वतीने गिरगाव , जुहू येथे खत निर्माण करणारे यंत्र देखील बसवण्यात आले होते. श्रीसदस्यांनी निर्माल्यामधील फुले व हारमधील धागा दोरा काढून फक्त फुले पाने यंत्रात टाकत होते. त्याद्वारे फुलांचा चुरा करून ते गोण्यामध्ये भरण्यात येत होते. यापासून गांडूळ खताची निर्मिती करण्यात येणार असल्याचे सदस्यांनी सांगितले. खत निर्माण झाल्यानंतर प्रतिष्ठान ने जिथे जिथे वृक्ष रोपण करण्यात आले आहे तिथे या खताचा वापर करण्यात येणार असल्याचे श्रीसदस्यांनी सांगितले. प्रतिष्ठानच्या या उपक्रमामुळे जलप्रदूषण कमी होण्यास नक्कीच मदत होईल अशी प्रतिक्रिया काही भाविकांनी व्यक्त केली.

प्रतिष्ठानच्या या उपक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ची उपस्थिती, श्रीसदस्यांचे केले कौतुक दरवर्षी श्रीगणेश चतुर्थी दरम्यान डॉ नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या निर्माल्य पासून खत निर्मिती या उपक्रमाचे केंद्र व राज्य शासनाकडून कौतुक होत असते यंदा राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतःहा प्रतिष्ठानच्या श्रीसदस्यांनी राबवलेल्या या उपक्रमात उपस्थिती लावून श्रीसदस्यांचे कौतुक केले. तसेच यावेळी त्यांनी श्रीसेवा सुद्धा करण्याचा आनंद घेतला.

## 'लाडकी बहिण योजना' बंद करू, सुनील केदारांच्या वक्तव्यावर सेनेची टीका

प्रतिनिधी
■ मुंबई

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना सुरु झाल्यापासून काँग्रेस नेत्यांनी या योजनेचा विरोध केला. आता सुनील केदार यांनी सत्तेत आल्यास लाडकी बहिण योजना बंद करु या संतापजनक विधानाने काँग्रेसच्या महिलाविरोधी भूमिकेवर शिक्कामोर्तब केले, अशी टीका शिवसेना उपनेते व प्रवक्ते संजय निरुपम यांनी केली.

एका पत्रकार परिषदेत बोलताना निरुपम पुढे म्हणाले की, काँग्रेस सुरुवातीपासून मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना बंद करण्याचे षडयंत्र रचत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी या योजनेची घोषणा केली तेव्हापासून काँग्रेसने या योजनेचा विरोध केला. राज्य सरकारकडे पैसे नाहीत, ही योजना केवळ दिखावा आहे, असे सांगून लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला होता.

काँग्रेसकडून योजनेचा अपप्रचार सुरु असला तरी दुसऱ्या बाजूला राज्यभरात लाडक्या बहिणींनी योजनेसाठी नोंदणी सुरुच ठेवली होती. रक्षाबंधनापूर्वी सरकारने १ कोटी ६० लाख महिलांच्या बँक खात्यात या योजनेचे पैसे जमा केले. त्यानंतरही काँग्रेसने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र न्यायधीशांनी याचिकाकर्त्याला फटकारले, असे निरुपम म्हणाले. आताही मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठापुढे काँग्रेसच्या कार्यकर्त्याने लाडकी बहिण योजनेविरोधात याचिका दाखल केली आहे. यावरुन काँग्रेसला किती द्वेष आहे हे दिसून येते, अशी टीका निरुपम यांनी केली.

## कुठलाही गाजावाजा न करता मुलुंडच्या राजाचे विसर्जन

### कार्यकर्त्याच्या मृत्यूनंतर मदतीची अपेक्षा




प्रतिनिधी
■ मुंबई

ऐन गणरायाच्या आगमनावेळी बॅनर बांधणा-या दोन कार्यकर्त्यांना बीएमडब्ल्यू कारने जोरदार धडक दिली होती. या दुर्घटनेत प्रीतम थोरात या कार्यकर्त्याचा जागीच मृत्यू तर प्रसाद पाटील हा गंभीररित्या जखमी झाला होता. या प्रकरणात कार चालक शक्ती अलग याला पोलिसांनी खारघर येथून अटक केली होती. त्यामुळे दु:खाचे सावट असलेल्या मुलुंडचा राजा या गणरायाचे विसर्जन कोणत्याही प्रकारचा गाजावाजा तसेच रोशनाई न करता शांततेत मुलुंड येथील मोरर्या तलावात करण्यात आले. मुलुंड पुर्व गव्हाणपाडा येथील हिट अँन्ड रन दुर्घटनेत प्रीतम थोरात याचा जागीच मृत्यू झाला होता तर गंभीर जखमी प्रसाद पाटील याच्यावर ज्युपिटर रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

प्रसाद पाटील याच्या उपचारावर साधारण 35 लाख रुपये खर्च अपेक्षीत असून त्याच्या मदतीसाठी अनेकांना आवाहन करण्यात आले आहे. घटनेनंतर ईशान्य मुंबई महाविकास आघाडीचे खासदार संजय दिना पाटील यांनी प्रीतम थोरात याच्या कुटुंबीयांची भेट घेतली तर रुग्णालयात जाऊन प्रसाद पाटील याची विचारपुस केली. या घटनेनंतर मुलुंडचा राजा मंडळावर शोककला पसरली होती. कुठल्याही प्रकारची रोशनाई तसेच गाजावाजा न करता रात्री बारा नंतर मुलुंड येथील मोरर्या तलावात विसर्जन केले. यावेळी मोठ्या प्रमाणावर भाविकांनी गर्दी केली होती. खा. संजय दिना पाटील यांच्या प्रयत्नाने या ठिकाणी अनेक स्वयंसेवकांची एक टिम कार्यरत करण्यात आली होती. त्यांच्या मार्फत विसर्जन, साफसफाई तसेच देखरेख करणे या सारखे काम करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती. पालिकेच्या टी विभागाचे सहाय्यक आयुक्त पाटणे तसेच पालिका अधिकारी, कर्मचारी व शिवसेनेचे पदाधिकारी अभिजीत चव्हाण आणि कार्यकर्ते यांनी यावेळी विसर्जनासाठी आलेल्या गणेश भक्तांना सर्वोतोपरी मदत केली.

## गोराईतील हॉटेल व्यावसायिक डेस्मन्ड गुढीन्हो यांचे निधन



**मुंबई :** साप्ताहिक मानव एकताचे संपादक , गोराईतील सुप्रसिद्ध हॉटेल व्यावसायिक व ऑल इंडिया ख्रिस्त सभेचे अध्यक्ष डेस्मन्ड लॉरेन्स गुढीन्हो उर्फ दादा यांचं शुक्रवारी वयाच्या 61 व्या वर्षी अल्पश: आजाराने निधन झालं .त्यांची पार्थिव यात्रा बुधवार दिनांक 18 सप्टें रोजी दुपारी 3.30 वाजता शेफाली - हलवार पाखाडी येथिल राहत्या घरातून निघाली व 4 वाजता होली मॅगी चर्च येथे मास संपन्न झाला. अडले नडलेल्याना मदत करणं हा त्यांचा स्वभाव होता .कोरोना काळात तर असंख्य गरजूंना मदतीचा हात दिला होता.'साप्ताहिक मानव एकता 'च्या माध्यमातून त्यांनी नेहमीच सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली तर ख्रिस्त सभेच्या माध्यमातून ख्रिस्ती बांधवांना एक छत्राखाली आणण्याचा प्रयत्न केला .त्यांच्या जाण्याने मनोरी ते उत्तन - चौक परिसरात शोककळा पसरली.त्यांच्या मागे त्यांची पत्नी ,मुलगा- सून ,मुलगी -जावई ,नातवंडे ,तीन भाऊ असा मोठा परिवार आहे

## बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड आणि खासदार अनिल बोंडे यांच्या वक्तव्याचा युवक काँग्रेसकडून पुतळे जाळून निषेध

प्रतिनिधी
■ मुंबई

बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड आणि राज्यसभा खासदार अनिल बोंडे यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर केलेल्या आक्षेपार्ह आणि प्रक्षोभक वक्तव्याचा मुंबई युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष सुफियान हैदर यांच्या नेतृत्वाने तीव्र शब्दात निषेध करून त्यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याचे दिंडोशी मतदार संघात दहन केले.

"आम्ही आमचे नेते राहुल गांधी यांच्या विरोधात अशी द्वेषपूर्ण आणि फूट पाडणारी भाषा खपवून घेणार नाही.



संजय गायकवाड यांचे वक्तव्य हे भाजपच्या द्वेष आणि असहिष्णुतेच्या राजकारणाचे स्पष्ट उदाहरण आहे," असे सुफियान हैदर म्हणाले.

या वेळी संजय गायकवाड आणि अनिल बोंडे यांची बिनशर्त माफी मागावी, गायकवाड आणि बोंडे यांच्यावर महाराष्ट्र भाजप आणि शिंदे सेना नेतृत्वाने कठोर कारवाई करावी, अशा मागण्या करून "युवक काँग्रेस अशा द्वेष पसरवणाऱ्या कारवायांविरुद्ध लढा देत राहील आणि लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि सर्वसमावेशकता ही मूल्ये जपतील," असे हैदर म्हणाले.

## एमबीबीएस, बीडीएस अभ्यासक्रमाची दुसरी फेरी 26 सप्टेंबरपासून

■ मुंबई

वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमाच्या पहिल्या फेरीतील प्रवेश ५ सप्टेंबर रोजी संपल्यानंतर दुसऱ्या फेरीतील प्रवेशाचे वेळापत्रक वैद्यकीय समुपदेशन समितीने जाहीर केले आहे. त्यानुसार राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या प्रवेश फेरीला २६ सप्टेंबरपासून सुरुवात करीत आहे. दरम्यान, १ ऑक्टोबरपासून वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमाचे शैक्षणिक वर्ष सुरू होणार आहे.

नवी दिल्लीतील वैद्यकीय समुपदेशन समितीकडून वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमाची प्रवेश फेरी राबविण्यासंदर्भातील वेळापत्रक जाहीर केले जाते. त्यानुसार प्रवेशाच्या वेळापत्रकाची अंमलबजावणी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून करण्यात येते. वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमाची पहिली प्रवेश फेरी ५ सप्टेंबर रोजी संपली.

बाप्पा, आभाळ भरले होते तू येताना
डोळे भरुन आले आहेत तू जाताना.
काही चुकलं असेल तर माफ कर!

# पुढच्या वर्षी ये लवकर...










सर्व छायाचित्रे - अनिल पानस्कर

सोमवारी अनंत चतुर्दशीदिनी मुंबईसह महाराष्ट्रातील सार्वजनिक व घरगुती गणरायांना विसर्जनासाठी निरोप देण्यात आला. लाडक्या बाप्पाला निरोप देताना कामगार विभागातील भाविकांनी मिरवणूक काढत जड अंतःकरण आणि साश्रू नयनांनी आपल्या आराध्याला निरोप दिला.















बाप्पाच्या विसर्जनाच्या निमित्ताने छोट्या व्यापाऱ्यांनी व फेरीवाल्यांनी रस्त्यावरच वस्तू विक्रीची संधी घेतली.शिवाय डोंबाऱ्यांनीही खेळ लावले होते.




















बाप्पाच्या उत्सवादरम्यान १० दिवस दिवस-रात्र कडक पहारा देणाऱ्या मुंबई पोलिसांनी शहरातील गणेश विसर्जन मिरवणुकींसाठीही मोठे संरक्षण दिले होते.












बाप्पाच्या विसर्जनाच्या निमित्ताने गिरणगावाला यात्रेचे स्वरूप आले होते. विसर्जन मिरवणुकीवर जागोजागी स्थानिक सामाजिक आणि धार्मिक संस्थांनी बाप्पांवर पुष्पवृष्टी करीत निरोप दिला

